## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे









बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



वर्ष -९ | गोंदिया | अंक २८ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.२४ ते ३० जून २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## प्रश्न विचारण्यात राज्यातील तीन खासदार पुढे
## खा.मेंढेची उपस्थिती तिसऱ्या क्रमांकावर



**गोंदिया:** लोकसभेत सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या पाच खासदारांमध्ये पहिल्या तीन क्रमांकावरचे खासदार हे महाराष्ट्रातील आहेत. २१२ प्रश्न विचारणाऱ्या बारामतीच्या सुप्रिया सुळे प्रथम क्रमांकावर असून त्यांच्यापाठोपाठ धुळ्याचे सुभाष भामरे आणि शिरूरचे डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रत्येकी २०२ प्रश्न विचारले आहेत.

मध्य प्रदेशातील मंदसौर येथील खासदार सुधीर गुप्ता (१९८ प्रश्न) आणि झारखंड येथील जमशेटपूर येथील खासदार बिद्युत महतो (१९५ प्रश्न) हे चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत. पुण्यातील परिवर्तन संस्थेने पहिल्या वर्षीच्या खासदारांच्या कामकाजाचा अहवाल जाहीर करताना ३१ मेपर्यंतच्या कामाची दखल घेतली आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अंकिता अभ्यंकर, समन्वयक तन्मय कानिटकर आणि सायली दोडके यांनी सोमवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत दिली. हा अहवाल khasdar.info या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सतराव्या लोकसभेच्या गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये झालेल्या तीन अधिवेशनांमध्ये मुंबईच्या सत्ताधारी पक्षाच्या तीन खासदारांनी सवोत्तम कामगिरी केली आहे; तर लोकसभेत सर्वाधिक प्रश्न मांडणाऱ्या खासदारांमध्ये पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन खासदारांनी अव्वल तीन क्रमांकात स्थान मिळविले आहे. लोकसभेतील विविध चर्चांमध्ये सहभागी होणाऱ्या खासदारांमध्ये राज्यातील खासदार तुलनेने मागे आहेत.

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर वर्षभरातील खासदारांच्या कामगिरीचा आढावा परिवर्तन संस्थेने नुकताच प्रकाशित केला आहे. यामध्ये खासदारांची उपस्थिती, त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न, विविध चर्चामध्ये खासदारांनी घेतलेला सहभाग, खासदारांनी स्वतंत्रपणे मांडलेल्या विधेयकांची संख्या आणि खासदारांनी वर्षभरात वापरलेला निधी अशा पाच निकषांवर त्यांच्या कामगिरीचा लेखाजोखा झहरीवरी.ळपषे या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. लोकसभा आणि खासदार निधी अशा दोन वेबसाइटवरील माहितीच्या आधारे हे रिपोर्ट कार्ड बनविण्यात आले असून, नागरिकांनीच त्यांनी निवडून दिलेल्या खासदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन करावे, अशी अपेक्षा परिवर्तन संस्थेच्या अध्यक्ष अंकिता अभ्यंकर आणि प्रकल्प समन्वयक तन्मय कानिटकर व सायली दोडके यांनी व्यक्त केली.



■ ८५ खासदारांनी वर्षभरात लोकसभेत एकही प्रश्न विचारलेला नाही (राज्यातील चार खासदार)
■ १७ खासदार आत्तापर्यत चर्चेत एकदाही सहभागी झाले नाहीत (राज्यातील दोन खासदार)
■ खासदार धानोरकरांचा संसदेतील सहभाग फिफ्टी-फिफ्टी

गोपाळ शेट्टी (मुंबई उत्तर) आणि मनोज कोटक (मुंबई उत्तर पूर्व) या दोन खासदारांची लोकसभेतील उपस्थिती १०० टक्के आहे. तर कपिल पाटील (भिवंडी) आणि सुनील मेंढे (भंडारा-गोंदिया), हेमंत गोडसे (नाशिक) यांनी अनुक्रमे ९५ टक्के व प्रत्येकी ९३.७५ टक्के उपस्थितीसह अव्वल पाच जणांमध्ये स्थान मिळविले आहे.

**सर्वाधिक प्रश्न सुप्रिया सुळेंचे**

लोकसभेच्या तीन अधिवेशनांदरम्यान ८० दिवसांच्या कामकाजात राष्ट्रवादी काँग्रेसच्या बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सर्वाधिक २१२ प्रश्न विचारले आहेत. सुभाष भामरे (धुळे) आणि डॉ. अमोल कोल्हे (शिरूर) या राज्यातीलच दोन खासदारांनी प्रत्येकी २०२ प्रश्न विचारले आहेत.

**सर्वाधिक चर्चेतील सहभाग**


लोकसभेच्या गेल्या वर्षभरातील कामकाजामध्ये उत्तर प्रदेश येथील भारतीय जनता पक्षाचे खासदार पुष्पेंद्र सिंग चंदेल यांनी सर्वाधिक ३१७ चर्चामध्ये भाग घेतला. राज्यातून पुन्हा सुप्रिया सुळे यांनीच ९७ चर्चामध्ये सहभागी होत अव्वल स्थान मिळविले आहे. त्यांच्यासह शिवसेनेच्या राहुल शेवाळे (मुंबई दक्षिण मध्य), डॉ. श्रीकांत शिंदे (कल्याण), श्रीरंग बारणे (मावळ) आणि विनायक राऊत (रत्नागिरी-सिंधुदुर्ग) या चार खासदारांचा चर्चेतील सहभाग उल्लेखनीय आहे.

## कोरोना रिकव्हरी प्रमाणात गोंदिया जिल्हा राज्यात १३ व्या क्रमांकावर

**गोंदिया:-** कोरोना आजारातून बरे होण्याच्या राज्यातील सर्व जिल्ह्यांचा रिकव्हरी रेट राज्य शासनाच्या आरोग्यसेवा संचालनालयाने जाहीर केला.त्यात महाराष्ट्राचा रिकव्हरी रेट सध्या ४९.५ टक्के एवढा आहे .तर देशाचा ५२.७ टक्के इतका आहे.

राज्यात कोल्हापूर जिल्हा पहिल्या स्थानावर आहे.तर गोंदिया जिल्हा १३ व्या स्थानावर असून रिकव्हरी प्रमाण ६८.३ एवढा आहे. कोल्हापूरचा रिकव्हरी रेट ९०.४ इतका आहे. परभणी दुसऱ्या क्रमांकावर असून परभणी चा प्रमाण ८७.५ आहे. तर, हिंगोली जिल्ह्याचे प्रमाण ८४. ५९ टक्के असल्याने हिंगोली तिसऱ्या स्थानावर आहे. आरोग्य सेवा संचालनालयाच्या संचालक डॉ अर्चना पाटील यांनी यांनी ही माहिती जाहीर केली आहे.

जिल्हानिहाय प्रमाण जाहीर करण्यात आला आहे . केंद्र शासनाच्या नवीन डिस्चार्ज पॉलिसीनुसार व राज्यस्तरावरून देण्यात आलेल्या सूचनांनुसार सर्व रुग्णांच्या वर्गीकरणानुसार रुग्णांना वेळेवर डिस्चार्ज करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.रुग्ण बरे होण्याचे प्रमाणात कोल्हापूर, परभणी, हिंगोली पाठोपाठ वर्धा ७८.९६, गडचिरोली ७८, सिंधुदुर्ग ७७.३, चंद्रपूर ७५.९, अहमदनगर ७४.६ उस्मानाबाद ७३.९,बीड ६९.९, सातारा ६९.५,यवतमाळ ६९ गोंदिया ६८.३,रत्नागिरी ६६.७, धुळे ६५.८, भंडारा ६५.९ बुलढाणा ६५ लातूर ६४.१, अकोला ६३.५ जालना ६३.३, अमरावती ६३, नागपूर६२.९, नांदेड ६२.५ आहे. सर्वात कमी असलेली जिल्हे वाशिम,पालघर,नंदुरबार,ठाणे व सोलापूर हे आहेत.



### सलग सहाव्या दिवशीही नवा बाधित रुग्ण नाही

**गोंदिया -** जिल्ह्यात कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यात यश आले आहे.सलग सहा दिवसांपासून नवा कोरोना बाधित रुग्ण आढळून आलेला नाही.त्यामुळे थोडा दिलासा मिळाला आहे. अद्यापही १३९ अहवाल प्रयोगशाळेत प्रलंबित आहे.आतापर्यंत जिल्ह्यात १०२ कोरोना बाधित रुग्ण आढळले.७२ रुग्ण हे उपचारातून कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहे.जिल्ह्यात आता क्रियाशील कोरोना रुग्णांची संख्या ३० इतकी आहे.

जिल्ह्यात आढळलेले १०२ कोरोना बाधित रुग्ण हे अर्जुनी/मोरगाव तालुका - ३१,सडक/अर्जुनी तालुका - १०, गोरेगाव तालुका - ४, आमगाव तालुका -१, सालेकसा तालुका - २, गोंदिया तालुका - २२ आणि तिरोडा तालुक्यातील ३२ रुग्ण आहे.गोंदिया येथील विषाणू चाचणी प्रयोगशाळेत कोरोना संशयित २०१४ व्यक्तींच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले.त्यामध्ये १०२ रुग्ण हे कोरोना बाधित आढळुन आले.१३९ नमुन्यांचा अहवाल प्रयोगशाळेत प्रलंबित आहे.

**१३९ अहवालांची प्रतीक्षा**
**२६९५ व्यक्ती विलगीकरणात**

७२ रुग्ण हे कोरोनामुक्त झाले आहे.विविध शाळा व संस्थांमध्ये ७७२ आणि घरी १९२३ अशा एकूण २६९५ व्यक्ती विलगीकरणात असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.श्याम निमगडे यांनी दिली.

## 'त्या'ठेकेदारांसाठी पीडब्लूडीचा सिलेक्टीव्ह टेंडर

**गोंदिया-** राज्यात सध्या कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव असल्याने अनेक कामांना स्थगिती मिळाली.मात्र मार्च महिन्यापुर्वीच येथील जिल्हा सामान्य रुग्णालय असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच बाई गंगाबाई महिला रुग्णालयाच्या काही किरकोळ कामांना प्रशासकीय मंजुरी मिळालेली होती.त्यामुळे त्यां कामाना प्राधान्याने करण्याबाबत वैद्यकिय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्याने आठवण पत्र काय दिले सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ च्यावतीने सोन्याचे घबाड सापडल्यासारखेच काम केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सुमारे १ ते २ कोटी रुपयाच्या कामासाठी विशेष करुन सिलेक्टीव्ह टेंडर प्रकिया राबविण्यात आली.जेव्हा की काम करायचेच होते तर ओपन ईटेंडर करायला काहीही हरकत नसावी,जर काम अत्यावश्यकच असेल तर.परंतु तसे काही झाले नाही या सिलेक्टीव्ह टेंडरमध्ये ५ टक्केचा वाटा महत्वाचा ठरल्याचे बोलले जात असून ज्या सिलेक्टिव्ह टेंडरसाठी २०-२५ निवडक कंत्राटदारांची नावे अधिक्षक अभियंता देबवडकर यांना पाठविण्यात आली होती,त्या यादीत असलेल्या जैन व तिगाला याच कंत्राटदारांची पात्रता योग्य असल्याचे कार्यकारी अभियंत्याना कसे कळले हा प्रश्न सध्या शहरातील सर्वच कंत्राटदार वर्गात चर्चेचा ठरला आहे.त्यातच काही दिवसापुर्वी करण्यात आलेला डांबरीकरणाचा दर्जा सुध्दा निकृष्ठ स्तरातील असल्याची ओरड निर्माण झाली होती.



कोरोना संसर्गात जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात येऊ शकते अशी माहिती अधिक्षक अभियंत्याना देत त्या कामाचे ईटेंडर करण्याऐवजी सिलेक्टीव्ह टेंडरकरीता निवडक २०-२५ कंत्राटदारांची यादी पाठवून मंजुरी घेण्यासाठी एवढा खटाटोप का करण्यात आला हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.यातच सर्वांनाच ते काम कुठले अशा प्रश्न मनात नक्कीच सर्वांच्या येईल: ते काम म्हणजे जिल्हा सामान्य रुग्णालयातील एक शौचालयाचे गटर टँक रिपेयर,दुसरे काम शौचालयाची दुरुस्ती,तिसरे काम बाई गंगाबाई महिला रुग्णालयात किरकोळ दुरुस्ती व रंगरगोंटीसह अन्य एका कामाचा त्यात समावेश आहे.आता ही कामे किती रुपयाची: हा सुध्दा महत्वाचा प्रश्न तर गटर टँक दुरुस्तीसाठी २५ लाख रुपयाचे कंत्राट देण्यात आले.शौचालयाच्या किरकोळ दुरुस्तीसाठी २५ लाख रुपयाचे कंत्राट देण्यात आले.बाई गंगाबाई रुग्णालयासाठी २५ लाख रुपये आणि अन्य एका कामासाठी २५ लाख रुपये असे १ कोटी रुपयाचे नियोजन बांधकाम विभागाने कोरोना काळात अतिमहत्वाचे म्हणून केले.

यापैकी सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गटर व शौचालयाचा काम जैन नामक कंत्राटदाराला तर उर्वरित दोन काम हे तिगाला नामक कंत्राटदाराच्या नावे दिली गेली आहेत.त्या कामांकडे बघितल्यास सर्वसामान्य व्यक्तीच्या घरातील गटर टँकचे सुध्दा दुरुस्तीसाठी १ लाख रुपये खर्च येत नसतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असलेल्या रुग्णालयाच्या गटर व शौचालयाची अशी कुठली दुरुस्ती आहे की त्यासाठी २५ लाख रुपये खर्च यायला लागले आणि अन्य त्या दोन कामांचेही तसेच आहे.जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात कितीही इमारती वेगवेगळ्या असल्या तरी तो परिसर एकच असल्याने एकाच कंत्राटदाराला ते काम क्लब करुन द्यायला हवे होते.

परंतु तसे काम का देण्यात आले नाही.त्यातच जे हे चार काम कार्यकारी अभियंता यांनी कोरोना काळात दिले ते फक्त दोन कंत्राटदारांनाच कसे दिले.त्या कंत्राटदारांनाच गटर व शौचालय दुरुस्तीचे काम येते इतरांना नाही काय असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.या नियमबाह्य कोरोनाकाळातील प्रकाराची तक्रार राज्याचे मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडेही तक्रार झाल्याचे वृत्त समोर येऊ लागले आहे.

## सीईओ दयानिधीची बदली उल्हासनगर महापालिकेत



**गोंदिया-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.राजा दयानिधी यांची बदली उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त पदी करण्यात आल्याचे आदेश मुख्य सचिव(सेवा)सीताराम कुंटे यानी काढले आहेत.सोबतच दयानिधी यांना समीर उन्हाळे यांच्या जागेवर तत्काळ रूजू होण्याचे आदेश देत नागपूर आयुक्तांच्या सल्याने आपला प्रभार वरिष्ठांकडे सोपविण्याचेही निर्देश देण्यात आले आहे.

दयानिधी यांच्या बदलीचे आदेश येताच जिल्ह्यातील सर्वंच संवर्गातील अधिकारी व कर्मचारी वर्गात आनंदाचे वातारवरण दिसून आले.दयानिधी यांनी जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे तीन दिवसीय आंदोलन काळातील वेतन कपात केले होते.त्यामुळे सर्वच कर्मचारी त्यांच्या विरोधात होते.तर त्यांची कार्यप्रणाली सुध्दा जिल्हा परिषदेच्या विकासाला बाधा पोचविणारी व गुन्हेगार प्रवृत्ती व कामचुकार कर्मचाऱ्याप्रती सहानुभूती दाखविणारी राहिल्यामुळे कर्मचारी वर्गात बदलीचे आदेश येताच चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

विशेष म्हणजे जिल्हा परिषदेतील गैरकारभाराबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे यांनी मुख्यमंत्र्याकडे सीईओ यांची लेखी तक्रार केली होती.त्या तक्रारीचा परीणाम सुध्दा बदली आदेशावर असल्याचे बोलले जात असून जिल्ह्यातील असे अनेक अधिकारी ज्यांची तक्रार झालेली आहे,त्यांच्या सुध्दा बदल्या किंवा निलबंनाची कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## विज बिल माफ करा,कर्जमाफी पुर्ण करा-भाजपचे महाविकास आघाडीविरोधात आंदोलन





**भंडारा-**भारतीय जनता पक्षाच्यावतीने राज्यातील महाविकास आघाडी सरकारने केलेल्या पोकळ घोषणेचा जाब विचारण्याकरीता तसेच शेतकऱ्यांना पिक कर्जासोबतच कर्जमाफी करीत सरसकट आकारलेले वीज बिल माफ करण्याच्या मागणीकरीता आंदोलन करीत निवेदन सादर करण्यात आले.विशेष म्हणजे संचारबंदी असून पाच व्यक्तीच्यावर अधिक व्यक्ती एकत्र येऊ शकत नसतांना खा.सुनिल मेंढे यांच्या नेतृत्वात या संचारबंदीच्या नियमाला मोडून जिल्हाधिकारी कार्यालयावर पायदळ मोर्चा काढून सरकारचा निषेध नोंदविण्यात आला.जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले.यावेळी खासदार सुनिल मेंढे,चैतन्य उमाळकर,शहर अध्यक्ष संजय कुंभलकर,विनोद बांते,प्रशांत खोब्रागडे,अरविंद भालादरे,नरेश बोंद्रे, करमचंद वैरागडे,हेमंत बांडेबुचे,मयूर बिसेन,विकास मदनकर,मंगेश वंजारी,मिलिंद मदनकर,अजीज शेख,राजेश टिचकुले,अजय ब्राम्हणकर,रोशन काटेखाये,भुपेश तलमले,शैलेश मेश्राम ,नंदकिशोर पारधी, सय्यद फईम,ओजल शरणागत,साधना त्रिवेदी,वनिता कुथे,आशा उईके,गीता सिडाम,रोशनी पडोळे,माला बगमारे,प्रीती जांभूळकर,प्रीती गोसेवाडे तसेच जिल्हा व शहर पदाधिकारी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्ह्यात १ लक्ष २३ हजार नागरिकांनी केला अप डाऊनलोड

**गोंदिया-**राज्यात कोरोना विषाणूचा संसर्ग झपाट्याने पसरत आहे. जिल्ह्यात देखील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये. जरी आवश्यक असले तरी बाहेर पडतांना मास्क, दुपट्टे व सुरक्षित सामाजिक अंतर ठेवावे. तसेच कोरोनावर मात करण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांनी आरोग्य सेतु ?पचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कादंबरी बलकवडे यांनी जिल्हयातील नागरिकांना केले आहे.

## विहिरीत पडलेल्या तीन चितळांना जंगलात सोडले



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील गिरोला येथे एका विहिरीत तीन चितळ पडल्याची घटना सोमवारी सकाळी पाच वाजता घडली.वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या सोंदड वनक्षेत्रातील गिरोला येथील देवराम सुपारे यांचे शेतातील विहिरीत(दि.२२)सोमवार ला पहाटेच्या सुमारास दोन मादी एक नर चितळ विहिरीत पडल्याची घटना घडली.

यापैकी एका चितळाचे पाय मोडले तर दोन चितळ सुरक्षित होते. त्या दोन्ही चितळांना नजीकच्या जंगलात सोडण्यात आले आहे.जखमी चितळाला नागपूर येथील गोरेवाडा सेंटर येथे ठेवण्यात आले आहे. रात्री पाण्याच्या शोधात किंवा वाघाने केलेल्या हल्ल्यापासून जीव वाचवण्यासाठी हे चितळ धावत सुटले असावेत व विहिरीत पडले असावेत असा अंदाज व्यक्त केला जातो आहे.

## बिनपगारी गुरुजी आता मनरेगाच्या कामावर

**गोंदिया:-**ज्यांच्या खांद्यावर देशातील पिढ्या घडविण्याची जबाबदारी शासनाने टाकली आणि तब्बल २० वर्षापासून ज्या शिक्षकांनी वेतनाची एक कवडी सुद्धा बघितली नाही, अशा राज्यातील २२ हजार ५०० शिक्षकांवर गलितगात्र होण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. आईवडिलांच्या कमाईवर आपले आणि आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणारे हे शिक्षक आता आपल्या पोटाची आग विझविण्यासाठी रोजगार हमीच्या कामाकडे वळू लागले आहेत. देशाला विश्वगुरू वा महासत्ता बनविण्याचे गोड स्वप्न दाखविण्याऱ्या महाभागांच्या हे ध्यानात येऊ नये, हे कदापि शक्य नाही. पण भांडवलशाहीला खतपाणी घालणारी व्यवस्था शोषित समाज निर्माण करण्याकडे मार्गक्रमण तर करीत नसावी ना? अशा प्रश्न या पीडित शिक्षकांच्या मनात घर करून गेला आहे. या प्रकारामुळे समाजव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती सुद्धा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण सर्वसामान्य गरीब जनता पोशिंदा असलेल्या मायबाप सरकारवर अवलंबून आहे. जर ही व्यवस्थाच मोडीत काढली गेली,तर शोषितांचा भला मोठा गट निर्माण होऊन त्यांच्या खांद्यावर श्रीमंतांचे टोलेगंज बंगले उभे राहतील. कदाचित, या बड्या लोकांच्या खातीरदारीसाठीच तर समाजात तेढ निर्माण करण्याचे कारस्थान रचले जात नसावे, असा एक विचारप्रवाह समाजात निर्माण झाला आहे. यातील एक कळी म्हणून या बिनपगारी शिक्षकांकडे आज बघितले जात आहे.



महाराष्ट्रात गेली १९ ते २० वर्षांपासून बिन पगारी शिक्षकाची नोकरी करणाऱ्या २२ हजार ५०० शिक्षकांच्या घरातील चुली आज विझल्या आहेत. शासनाने २८ फेब्रुवारी २०१८ रोजी राज्यातील १४६ उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय आणि १३ सप्टेंबर २०१९ ला १ हजार ६३८ उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी १ एप्रिल २०१९ पासून २०% नुसार अनुदानाची घोषणा केली होती. त्यासाठी २४ फेब्रुवारी २०२० च्या राज्य अधिवेशनात १०६ कोटी ७२ लाख ७६ हजार रुपयाची आर्थिक तरतूद सुद्धा केली. या तरतुदीचा शासन निर्णय निर्गमित होण्याकरिता शासन स्तरावर सर्व शिक्षक आमदार, सर्व पक्षाचे नेते, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित कमवी कृती संघटनेचे पदाधिकारी, अशा तमाम नेत्यांनी शासनाकडे अनेक वर्षापासून बिनपगारावर काम करणाऱ्या हजारो शिक्षकांना न्याय देण्याकरिता पाठपुरावा केला.

परंतु शासनकर्त्यांना आणि अर्थमंत्री अजित पवार तसेच शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे विनवणी करून सुद्धा सर्व लोकांना आश्वासनापलीकडे काहीच मिळालेले नाही. यातच या शिक्षकांनी आता १ जुलै २०२० पासून संपूर्ण राज्यात पगार नाही, तर शाळा नाही, अशा प्रकारची ठोस भूमिका घेतली आहे. यामुळे शिक्षकांकडे आता सर्वांचे लक्ष गेले आहे. सरकारने या शिक्षकांच्या कुटुंबाला जगण्याकरिता लागणारी किमान तरतूद केली, त्या तरतुदीनुसार २० टक्के पगार तरी सुरू करावा, अशी ट्विटरच्या माध्यमातून व फेसबुकच्या माध्यमातून शासनाला विनवणी करत आहेत.

सध्या संपूर्ण देश व राज्यावर कोरोना महामारीचे संकट आहे. अशात हे बिनपगारी शिक्षक पोटाची खळगी भरण्यासाठी शेतामध्ये राबत आहेत. गोंदिया जिल्ह्यात सुमारे ५-६ शे शिक्षक गेल्या २० वर्षापासून उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयात इमानेइतबारे विद्यार्थ्यांना विद्यादान करीत आहेत. असे असताना शासनाला लाजवतील अशा काही घटना घडत आहेत.

तिरोडा तालुक्यातील बरेचसे शिक्षक व शिक्षिका आता महाराष्ट्र रोजगार हमीच्या कामावर राबताना दिसत आहेत. या शिक्षकांमध्ये प्रा. भरत जानबा नागदेवे, प्रा. दुर्गा रघुनाथ नागदेवी, प्रा.रवींद्र देवदास पटले, प्रा. मीनाक्षी संकपाल पटले, प्रा.सिद्धेश्वर कुंजीलाल बिसेन आदींचा समावेश असून ही बाब या पुरोगामी महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी आहे. या पीडित शिक्षकांना न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित उच्च माध्यमिक कृती संघटनेचे गोंदिया जिल्हा अध्यक्ष तथा नागपूर विभागीय सचिव प्राध्यापक कैलास बोरकर यांनी या बिन पगारी शिक्षकांची व्यथा शासनाकडे पोहोचविण्याच्या प्रयत्न केला. शासनाने पगार वितरणाच्या शासन निर्णय त्वरित काढून हजारो शिक्षकांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री, अर्थमंत्री व शिक्षण मंत्री यांना केलेली आहे.

## पीक कर्ज वाटपात जिल्हा बँकेची आघाडी

**गोंदिया:** खरीप हंगामाला सुरुवात झाली असून पीक कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत आणि ग्रामीण बँका माघारल्या असून गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सुरुवातीपासून घेतलेली आघाडी कायम ठेवली आहे. जिल्हा बँकेने आतापर्यंत शंभर कोटी ३६ लाख रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप केले आहे.

नाबार्ड आणि शासनाने यंदा खरीप हंगामात शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्याचे जिल्हा, राष्ट्रीयकृत आणि ग्रामीण बँकांना एकूण २७० कोटी रुपयांचे उद्दिष्ट दिले आहे. यात गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला १३६ कोटी ६२ लाख रुपयांचे उद्दिष्ट दिले आहे. यापैकी जिल्हा बँकेने २२ जूनपर्यंत एकूण २३ हजार ७३४ शेतकऱ्यांना शंभर कोटी ३६ लाख रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप केले आहे.

जिल्हा बँकेतंर्गत येणाऱ्या ३२९ सहकारी संस्थेच्या माध्यमातून पीक कर्जाचे वाटप केले जात आहे. राष्ट्रीयकृत आणि ग्रामीण बँकेच्या तुलनेत



जिल्हा बँकेतून पीक कर्जाची उचल करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ही बँक आपली वाटते. त्यामुळे दरवर्षी जिल्ह्यातील शेतकरी सर्वाधिक पीक कर्जाचे वाटप करते. शेतकऱ्यांना खरीप हंगामात आर्थिक समस्या भेडसावू नये शिवाय त्यांना सावकार आणि नातेवाईकांच्या दारात उभे राहण्याची वेळ येऊ नये यासाठी शेतकऱ्यांना पीक कर्जाचे कुठल्याही अडथळ्याविना वाटप करण्याच्या सुचना जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आ.राजेंद्र जैन यांनी जिल्हा बँकेच्या सर्व शाखा व्यवस्थापकांना दिले होते.

विशेष म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेस जिल्ह्यातील एकूण २१ हजार शेतकरी पात्र ठरले होते. मात्र यापैकी बऱ्याच शेतकऱ्यांना अजूनही कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे त्यांना नवीन पीक कर्जाची उचल करण्यापासून वंचित राहण्याची वेळ आली होती. ही अडचण जिल्हा बँकेने लक्षात घेत कर्जमुक्ती योजनेस पात्र ठरलेल्या यादीतील १२६० शेतकऱ्यांना ४ कोटी ५३ लाख ९४ हजार रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप करण्यात आले आहे.

जिल्हा बँकेच्या ९ हजार ४७१ सभासद शेतकऱ्यांना सुद्धा पीक कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व संचालक मंडळाने सुद्धा शेतकऱ्यांच्या समस्यांची वेळोवेळी दखल त्यांना पीक कर्जाची उचल करताना त्रास होणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे जिल्हा बँक इतर बँकांच्या तुलनेत पीक कर्ज वाटपात आघाडीवर आहे.

## संपादकीय

# राज्यांनी परस्परांपासून धडे घ्यावेत!

"डिजिटल क्रांती"च्या या युगात आयुष्यातील सर्वात ऐहिक बाजूंवर तत्काळ (रिअल-टाईम) प्रतिक्रिया प्राप्त करण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञान आणि बिग डेटा उत्क्रांत झालेले असताना, राज्ये कुपोषणासारख्या विकासाच्या मार्गातील मोठया आव्हानांबाबत एकमेकांच्या अनुभवातून व पुराव्यांतून शिकू शकतील, अशी औपचारिक यंत्रणा आपण विकसित केलेली नाही, हे आश्चर्यकारक आहे.

जगातील सर्वाधिक कुपोषित (उंचीच्या मानाने खूपच बारीक व गंभीर स्वरूपाच्या कुपोषणाची लक्षणे दिसणारी) मुलांपैकी निम्मी भारतात आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेने २०१८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जागतिक पोषण अहवालात नमूद केले आहे. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणासारख्या आपल्या स्वत:च्या सर्वेक्षणांमध्येही देशातील ९३.४ लाख मुले तीव्र गंभीर स्वरूपाच्या कुपोषणाने (एसएएम) ग्रासलेली असावीत असा अंदाज आहे. त्याहून चिंताजनक बाब म्हणझे एसएएम वर्गात मोडणा-या मुलांची संख्या गेल्या दशकभरात कमी झालेली नाही. एसएएम मुले दगावण्याचा धोका चांगले पोषण मिळणाऱ्या मुलांच्या तुलनेत नऊ पट अधिक असतो असा इशारा सार्वजनिक आरोग्य शास्त्रज्ञ देत आहेत.

एसएएमचे एवढे प्रचंड प्रमाण आपण खपवून घ्यायला नको असे संकेत जगभरातील अनुभवांवरून मिळतात. कारण, एसएएम विभागातील ८०-९० टक्के मुलांमध्ये अन्य काही वैद्यकीय आजार नसेल, तर त्यांच्यावर घरी उपचार करणे शक्य आहे. याला तीव्र कुपोषणाचे समुदायाधारित व्यवस्थापन (सीएमएएम) असे म्हणतात. सीएमएएम पद्धतीमध्ये अंगणवाणी कार्यकर्त्यां आणि अन्य स्वयंसेवक समुदायाच्या स्तरावर मुलांपर्यंत पोहोचतात. यासाठी काहीवेळा दारोदार जाऊनही मुलांचा शोध घेतात. ज्या मुलांमधील कुपोषणाची समस्या लक्षात येईपर्यंत पार विकोपाला गेलेली आहे आणि ज्यांना रुग्णालयात उपचारांसाठी जाणे शक्य नाही, अशी मुले ते शोधून काढतात. २०१८ मध्ये भारत सरकारने पोषण अभियान (यापूर्वी, भारतीय पोषण कार्यक्रम म्हणून हा उपक्रम ओळखला जात असे) सुरू केले. २०२२ पर्यत कुपोषणाचे निर्मूलन करण्याच्या उद्दिष्टासह हे अभियान सुरू करण्यात आले. हे अभियान अत्यंत कौतुकास्पद आहे आणि याचा हेतू स्पष्ट आहे. मात्र, पहिली गोष्ट म्हणजे मुलांमधील एसएएमची समस्या हाताळण्यासाठी तसेच सीएमएएम स्वीकारण्यासाठी आपल्यातील काही राज्यांनी समुदायाधारित दृष्टिकोन अवलंबला आहे व या कामातून निर्माण होणा-या पुराव्याची नोंद आपण घेतली पाहिजे. यामुळे "एसएएम'चे ओझे कमी होईल, आपली मुले अधिक निरोगी होतील आणि जागतिक पोषण सूचीसारख्या महत्त्वाच्या दर्शकांवरील आपली जागतिक कामगिरी अधिक चांगली होईल.

भारतामध्ये महाराष्ट्र, झारखंड, राजस्थान आणि गुजरात यांसारख्या काही राज्यांनी सीएमएएम यशस्वीरीत्या अमलात आणले आहे आणि त्यामुळे मुलांमधील एसएएम कमी होत आहे. महाराष्ट्रातील प्रारूपाची विशेष प्रशंसा केली जाते, कारण, राज्य पोषण कार्यक्रम (राजमाता जिजाऊ माता बालक आरोग्य व पोषण कार्यक्रम-आरजेएमसीएचएन) सुरूकरणारे हे पहिले राज्य आहे. या कार्यक्रमाचा भर सर्वात अल्पवयीन, वंचित आणि सर्वात असुरक्षित लोकसंख्येवर आहे. ङ्गएसएएमफची समस्या हाताळण्यापूर्वी महाराष्ट्राने वाढ खुंटण्याची (शंटिंग) समस्या कमी करण्याची कौतुकास्पद कामगिरी केली. २००६ ते २०१२ या काळात शंटिंगचे प्रमाण १५ टक्क्यांनी कमी करण्यात महाराष्ट्राने यश प्राप्त केले.

२०१४ मध्ये महिला व बालविकास खात्याच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात एक सर्वसमावेशक सीएमएएम प्रायोगिक तत्त्वावरील कार्यक्रम सुरूकरण्यात आला. या कार्यक्रमाखाली, अंगणवाडी कार्यकर्त्यां सक्रिय रुग्ण शोधामध्ये विशेषत्वाने महत्त्वाची भूमिका बजावत होत्या किंवा सक्रियपणे मुलांची तपासणी करून एसएएम केसेसचे निदान करत होत्या. त्यांनी पूर्वीच अस्तित्वात असलेल्या ग्राम आरोग्य व पोषण दिवसांचा लाभ मुलांच्या तपासणीसाठी घेतला आणि दर तीन महिन्यांनी सुलभ एसएमसाठी मुलांची तपासणी करण्याकरता घरोघरी जाऊन समुदाय मोहिमा आयोजित करण्यात आल्या. अंगणवाडी कार्यकर्त्या आणि आशा यांनी घरे तसेच समुदायांतील माता तसेच मुलांची काळजी घेणा-या अन्य व्यक्तींना समुपदेशन व सहाय्य पुरवले. दुस-या बाजूला गुंतागुंतीच्या केसेस नजीकच्या आरोग्य केंद्रांकडे पाठवण्यात आल्या. ऑक्झिलिअरी नर्स मिडवाइव्हज (एएनएम) आणि आरोग्य केंद्रांमधील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमावरील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेण्याच्या पूर्वीच्या पद्धतीला सक्रिय रुग्ण शोध पद्धत पूरक ठरली. पारंपरिक पद्धतीला निष्क्रिय रुग्ण शोध पद्धतही म्हणतात.

अशा तऱ्हेने सीएमएएम कार्यक्रम लहान मुलांमधील एसएएम व्यवस्थापनासाठी तळागाळापर्यंत जाऊन मदत करू शकला. बाल संजीवनीचा भाग म्हणून मातांनाही मुलांना काय खायला द्यावे या विषयावर समुपदेशन पुरवले जाते. हे समुपदेशन त्यांच्या घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी दिले जाते. पुढे येत असलेल्या पुराव्यानुसार, ङ्गएसएएमफने ग्रस्त मुलांपैकी सुमारे ६६ टक्क्यांनी बाल संजीवनी योजनेखाली उपचारात्मक अन्न ग्रहण केले आहे. यातून उपचारांना सकारात्मक प्रतिसाद आहे, असे दिसून येते.

महाराष्ट्राची कहाणी ही संपूर्ण भारतासाठी खूप महत्त्वाची आहे. तीव्र कुपोषणावर मात करून चांगल्या आरोग्याची निष्पत्ती मिळवण्यासाठी सध्याच्या सरकारी प्रणाली देशव्यापी समुदायाधारित प्रारूप सकारात्म करीत्या अमलात आणू शकतात हे यातून दिसून येते. महाराष्ट्राकडून शिकण्यासारखे खूप आहे. लहान मुलांमधील कुपोषण, विशेषत: एसएएमचे वाढते ओझे कमी करण्यासाठी महाराष्ट्रातील कामगिरीची पुनरावृत्ती अन्य राज्यांत होऊ शकते.

# मंजुरी एकीकडे,बांधकाम दुसरीकडे



**गोंदिया:** दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत करण्यात येणारी विकासकामे केवळ जिथे दलित समाजाची वस्ती आहे, त्याच ठिकाणी करण्यात यावी. असे शासनाचे नियम आहे. असे असताना देखील नियमांना डावलून दलित वस्ती सुधार योजनेतून मंजूर झालेला रस्ता इतरत्र बांधण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या टेमनी ग्रामपंचायतीय उघडकीस आला आहे.

हा प्रकार स्थानिक ग्राम पंचायतीच्या सदस्यांनी उघडकीस आणला असून या प्रकरणाची तक्रार नोंदवून कंत्राटदार आणि कनिष्ठ अभियंत्यावर कारवाई करा, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्राम पंचायत टेमनी येथे २०१९-२० या आर्थिक वर्षात दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत जवळपास तीन लाख रुपयांचा सिमेंट रस्ता बांधकाम मंजूर करण्यात आला. तसेच पत्र शासनाने स्थानिक ग्राम पंचायतीला उपलब्ध करुन काम करण्याची परवानगी दिली. सदर रस्ता बांधकाम स्थानिक एका पदाधिकाऱ्यानेच केले असल्याची चर्चा आहे. सदर रस्ता बांधकाम हे ज्या दलित समाजातील व्यक्तीच्या घराजवळ मंजूर आहे. त्या ठिकाणी बांधकाम न करता इतरत्र केल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य आणि माजी सरपंच विनोद मेश्राम यांनी केला असून त्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे नोंदविली आहे. रस्ता बांधकाम सुरु असताना दस्तुरखुद कनिष्ठ अभियंता गायधने मोक्यावर उपस्थित होते. तरीही त्यांनी या संबंधात कुठलीही मनाई केली नाही. परिणामी संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध नाकारता येत नाही. असा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन शासकीय निधीची विल्हेवाट लावणाऱ्या कंत्राटदार आणि त्याला पाठिशी घालणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यावर कारवाई करा, अशी मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे. दलित वस्तीतील नागरिकांच्या मूलभूत सुविधांना चालना मिळावी व त्यांचेही जीवनमान उंचवाने म्हणून शासन दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कोट्यावधीचा विकासनिधी प्रस्तावित करत असतो. या कामांचे कंत्राट अनेक ग्रामपंचायत पदाधिकारी व राजकीय मंडळींना देण्यात येतात. यातील अनेक राजकीय मंडळी पदाचा गैरवापर करुन व अधिकाऱ्यांना हाताशी धरुन मोठ्या प्रमाणात दलित वस्ती निधीची विल्हेवाट लावत आहेत. त्यामुळे गावपातळीवरील दलित समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे. या प्रकरणी जिल्हा परिषद प्रशासन कोणती कारवाई करते याकडे लक्ष लागले आहे.

# जागृती पतसंस्थेच्या संचालकाविरोधात मुख्य व्यवस्थापकाची पोलिसात तक्रार

**गोंदिया:** मागील वर्षभरापासून डबघाईस निघालेल्या तिरोडा तालुक्यातील जागृती सहकारी पतसंस्थेच्या मुख्य व्यवस्थापकाने आता पतसंस्थेच्या संचालक मंडळाविरोधात पोलिसात तक्रार केल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आले आहे. त्यामुळे आता हे प्रकरण काय वळण घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तिरोडा तालुक्यातील जागृती सहकारी पतसंस्थेत मागील वर्षभरापासून खातेदार व ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. मदत संपल्यानंतरही ठेवीदारांना ठेवी देण्यास संस्थेकडून नकार दिला जात आहे. याबाबत ठेवीदारांकडून वारंवार विचारणा करुनही संस्थेकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. संस्थेच्या ११ पैकी अनेक शाखा बंद असून याकडे संचालक व शाखा व्यवस्थापकांचे दुर्लक्ष आहे. याबाबत प्रसारमाध्यमांनी प्रकरणाला वाचा फोडली असतानाच आता पतसंस्थेच्या मुख्य व्यवस्थापक साबीर तुरक यांनी संचालक मंडळाविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीत तुरक यांनी संचालक मंडळाने आपल्या अधिकारावर गदा आणून त्यांना विश्वासात न घेता शाखा व्यवस्थापकांना नियमबाहयपणे कर्ज वाटप करण्यास भाग पाडल्याचे म्हटले आहे. यात वाटप केलेले अनेक कर्ज हे नियम बाहय असून पतसंस्थेकडे त्याबाबत कुठलेही गहाणपत्र वा कागदपत्रे उपलब्ध नसल्याने कर्ज वसुलीस अडचण निर्माण होत आहे. विशेष म्हणजे संचालकांच्या शिफारसीने वाटप केलेले कर्ज वसुली करण्यासाठीही संचालक सहकार्य करीत नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी दोषी संचालक मंडळाविरोधात कारवाई करण्याची मागणीही तुरक यांनी केली आहे. सदर तक्रारीची प्रत जिल्हा उपनिबंधक यांना पाठविण्यात आली आहे.

# सागरी मत्स्यव्यवसाय नौकानयन प्रशिक्षण वर्गासाठी प्रवेशास ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**मुंबई** – मुंबईतील वसीवा येथील शासकीय मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या वतीने देण्यात येणाऱ्या सागरी मत्स्यव्यवसाय नौकानयन, सागरी इंजिन देखभाल आणि परिचालन प्रशिक्षण वर्गासाठी प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० जून २०२० पर्यत वाढविण्यात आली आहे.

मत्स्यव्यवसाय व सागरी मासेमारीचा विकास आणि विस्तार होण्याच्या दृष्टिकोनातून मत्स्यव्यवसायातील इच्छुक प्रशिक्षणार्थीसाठी शासकीय मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या वतीने सहा महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्याअनुषंगाने २०१९-२० या चालू वर्षातील प्रशिक्षण वर्ग दिनांक ०१ जुलै २०२० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज मागविण्याची मुदत वाढविण्यात येत असून दिनांक ३०/०६/२०२० पर्यत पात्र व इच्छुक प्रशिक्षणार्थींनी पुढील पत्यावर अर्ज पाठवावेत अर्ज पाठविण्याचा पत्ता- शासकीय मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग,तेरे गल्ली, वर्सोवा मुंबई – ६१ या पत्त्यावर अथवा षीींीलरळऽसारळश्र.लो या ईमेल वर ३० जून २०२० पर्यत सादर करावेत.

# उपशिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकाऱ्यांची राज्यात ३५० पदे रिक्त

**नागपूर:** राज्यात उपशिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांची ३५० पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. परिणामी तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर प्रशासकीय व शासनाच्या विविध योजना राबविताना प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट 'ब' उपशिक्षणाधिकारी व इतर तत्सम पदांच्या रिक्त १२३ जागा भरण्यासाठी १७ मे २०१७ रोजी जाहिरात देण्यात आली होती. त्यामध्ये प्राथमिक शिक्षकांना डावलण्यात आले होते. न्यायालयाच्या परवानगीने प्राथमिक शिक्षकांनी १३ ऑगस्ट २०१७ रोजी मुंबई येथे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा दिली. ही परीक्षा घेऊन दोन वर्ष दहा महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निकाल लावला नाही.

राज्य शासनाच्या ४ मे २०२० च्या निर्णयानुसार अर्थव्यवस्थेवर परिणाम लक्षात घेता नवीन पद भरतीला प्रतिबंध करण्यात आला आहे. मात्र शासनाच्या सेवेतील कर्मचारी असल्यामुळे मर्यादित विभागीय परीक्षेमधून भरण्यात येणारी १२३ पदे भरताना शासनावर आर्थिक बोझा पडणार नाही. कोर्टाच्या अधीन राहून ही निवड प्रक्रिया त्वरित राबविण्यात यावी.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व शिक्षण विभाग यांना निर्देश द्यावे, अशी मागणी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष देविदास बस्वदे व राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे.

# आत्मनिर्भरता:-एक संदेश

आयुष्याची एक चांगली सुरुवात...... आत्मनिर्भरता.

शांतीने चिरकाल शांती टिकते, हिंसेने नव्हे.

आत्मनिर्भर म्हणजे दुसऱ्यावर अवलंबून न राहणे. स्वयंपूर्ण स्वावलंबी बनणे म्हणजे आत्मनिर्भर होणे होय. आपल्या भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिनांक १२ मे २०२० ला राष्ट्राला संबोधित करताना आत्मनिर्भर भारत अभियान ची सुरुवात केलेली आहे. covid-१९ महामारी संकटापासून लढण्यासाठी आत्मनिर्भर भारत अभियान निश्चितच एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल आणि आधुनिक भारताची एक ओळख बनेल. या योजने किंवा अभियानाचा उद्देश एकशे तीस करोड भारतवासीयांना आत्मनिर्भर बनवायचे आहे कारण की देशाचा प्रत्येक व्यक्ती covid-१९ सारख्या संकटाच्या काळात खांद्याला खांदा लावून चालू शकेल तसेच या महामारीला हरवण्यासाठी आपले योगदान देतील. पीएम मोदी राहत पॅकेज अंतर्गत आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकार द्वारे वीस लाख करोड रुपये देशाच्या जीडीपी साठी दहा टक्के घोषित केलेले आहे. हे पॅकेज २०२० मध्ये या अभियानाला नवीन गती देईल. कोरोनाव्हायरस मुळे निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा केली.

हे पॅकेज गृह उद्योग, छोटे ,मध्यम आकाराचे उद्योगासाठी आर्थिक पॅकेज आहे. ज्या वस्तू आपल्या देशात आयात होत होत्या त्या आता देशातच निर्माण करायच्या, दुसऱ्या देशातून बोलवायचं नाही. हा आत्मनिर्भर योजनेचा हेतू आहे.

**"व्यवसाय आपला प्रयत्न आपला"**

आत्मनिर्भर भारत पाच खांबावर उभा राहिला आहे. ते पाच खांब म्हणजे अर्थव्यवस्था ,पायाभूत व्यवस्था ,तंत्रज्ञान व्यवस्था, आपली डेमोग्राफी आणि मागणी.

आपल्या भारताला स्वावलंबी बनवायचे आहे असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला आहे. कोरोणा मोठ्या काळासाठी आपल्या जीवनाचा भाग असेल असं शास्त्रज्ञ म्हणतात पण याचा अर्थ असा नाही की आपला आयुष्य फक्त कोरोना भोवतीच फिरेल. आपण अंतर राखून काम करूअसे पंतप्रधानांनी संदेश दिला आहे.

**"एकविसावे शतक भारताचे असेल हे स्वप्नच नाही तर ती आपली जबाबदारी आहे - यासाठी एकच मार्ग आहे आणि ते म्हणजे स्वावलंबी भारत."**

"वसुधैव कुटुंबकम"या उक्तीवर आत्मनिर्भर होण्यासाठी विश्वास ठेवायला हवा.. शाळा-कॉलेज covid-१९ च्या प्रादुर्भावाने बंद आहेत तर विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर होऊन स्वतः सेल्फ स्टडी करायला हवे. स्त्री आता आत्म निर्भर झालेली आहे. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. जगात आयुष्य आणि मरणाची लढाई सुरू असताना भारतातील औषधे लोकांचा जीव वाचवीत आहे. पहिले भारतामध्ये सुवर्णयुग होतं. त्यानंतर पारतंत्र ओढावल. आता भारताकडे सामर्थ्य आहे. उत्तम उत्पादन निर्माण करायला हवे. स्थानिक उत्पादनाचा आपला जीवन मंत्र बनवायचे आहे. स्थानिक उत्पादन करायला हवे व त्याचा प्रचार करायला हवे तसेच धाडसी सुधारणा देखील देशात करायला हवी त्यामुळे उद्योगांना शक्ती येईल व गुंतवणुकीला चालना मिळेल. पाश्चात्त्य देशात आई-वडील मुलांना अठरा वर्षाचे झाले तर आत्मनिर्भर व्हायला सोडून देतात परंतु आपल्या देशात म्हातारा होईपर्यंत आई-वडील मुलांची काळजी घेतात त्यांना आत्मनिर्भर बनवायला हवे. काही व्यक्ती नोकरी सोडून स्वतःचा रोजगार सुरू करत आहे हे आत्म निर्भर तेचे लक्षण आहे.

कोरोना संकटापासून वाचविण्यासाठी आर्थिक पॅकेज म्हणजे आत्मनिर्भर भारत अभियान आहे. म्हणजेच आपल्या गरजा आपणच पूर्ण करणे. तसेच देशी स्वातंर्त्यपूर्वकाळात होते. Make in India हे सांगितलेले आहे. संपूर्ण जगाला कोरोना च्या संकटाने विळखा घातलेला आहे त्याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे. परंतु कोरोनामुळे संपूर्ण लोक जग एकत्र आले आहेत. देशात दोन लाख मास्क किटस तयार होत आहेत. लोकल गोष्टीसाठी होकल बना असा नरेंद्र मोदी यांनी संदेश सांगितला आहे. तर मोहन भागवत यांनी स्वदेशीचा वापर करा असे म्हटलेले आहे. देशातील अर्थव्यवस्था मजबूत बनविणे फार आवश्यक आहे. पायाभूत सुविधांमध्ये चीनला भारताकडे आकर्षित करण्यासाठी जमीन, पाणी, वीज इत्यादी कडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. तंत्रज्ञान बाबतीत सकारात्मक पाऊल उचलायला हवे. सशक्त मनुष्यबळ म्हणजे आपल्या देशात पस्तीस वर्षे खाली पुष्कळ व्यक्ती आहेत ते भारताचे स्टेरिंग आहेत. मागणी आणि पुरवठा म्हणजे भारत देशात मोठी बाजारपेठ आहे. गुंतवणूक दर, मागणी, ग्लोबल जागा, जागतिक पुरवठा साखळी तयार करायला हवे. आत्मनिर्भरता ही फार मोठी भिंत आहे. महाराष्ट्रात अनेक प्रकल्प झालेत. आत्मनिर्भरता, स्वदेशी, स्वालंबन आवश्यक आहे. आत्मकेंद्रित होणे जरुरी नाही. राष्ट्रीय संघ वक्ते यांनी म्हटले आहे की की अमेरिकेत शेअर बाजारात घसरत आहे. त्याचा परिणाम भारतावर होत आहे. म्हणून स्थानिक उद्योजकांना संरक्षण द्यावे लागेल. covid-१९ त्यामुळे अनेक कंपन्या मायदेशात आणू पाहत आहे. covid-१९ महामारी च्या पार्श्वभूमीवर पाचव्या वेळी देशातील जनतेला संबोधित करते वेळी आत्मनिर्भर बनले व सोबतच कोरोनाला हरवायला हवं असे मोदींनी संदेश दिला आहे.

आत्मनिर्भरता ही नवीन संकल्पना नाही. कारण गुरुकुल पद्धतीमध्ये मुले आई-वडिलांपासून दूर राहून शिक्षण घेत होते. त्यामुळे आत्मनिर्भरता भारतीय संस्कृतीत सुरू झालेली होती.

"भारतातील विविधतेतील एकतेचे कारण आमच्या संस्कृती आणि ज्ञानाचे उदाहरण."

सौ. भारती दिनेश तिडके
रामनगर गोंदिया
८००७६६४०३९.

# आरक्षणाचे जनक - छत्रपती राजर्षी शाहू राजे



आधुनिक भारताचे भाग्यविधाते, आरक्षणाचे जनक यशवंतराव घाडगे, म्हणजेच राजषी शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ राजी कोल्हापूर येथे झाला. शाहू राजे हे त्यांच्या कर्तृत्वामुळे नावाप्रमाणेच यशवंत राहिले. या भारतामध्ये छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व कार्याचा वारसा मोठ्या समर्थपणे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक महान मानवतावादी राजा म्हणून राजषी शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली. या व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असतांनासुध्दा सामाजिक बंधूभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये आजच्या लोकशाहीतील शासनालाही करणे शक्य होत नाही. असे अद्वितीय स्वरुपाचे कार्य केले.

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून या निधड्या छातीच्या समाजसुधारकाने ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. नुसती घोषणा करुन थांबणारे ते राजे नव्हते तर त्वरीत अंमलबजावणी करुन संबंधीत अधिकाऱ्याकडून रिपोर्ट मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवणीय पुढाऱ्यांनी विरोध केला. राजषीवर अनेक प्रकारचे आरोप केले.

परंतु वंचितांच्या विकासाचे व्रत घेतलेल्या शाहूंनी कशाचीही पर्वा न करता आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली. आज त्याच राजषी शाहूंचे वारसदार मात्र आरक्षणासाठी मंत्रालयाचे उंबरठचे झिजवत आहेत. परंतु स्वत:ला मराठा म्हणवून घेणाऱ्या आजच्या कोणत्याही राज्यकर्त्यांना शाहूंच्या या धाडसी निर्णयाप्रमाणे आपणही तात्काळ निर्णय घेऊन आजच्या आर्थिक विवंचनेत अडकलेल्या मराठा समाजाला आरक्षण द्यावे असे वाटत नाही ही फार मोठी शोकांकिकाच नव्हे तर राजषी शाहू राजांच्या विचारांची चेष्ठा चालवल्यासारखे आज चित्र आपण पहात आहोत. तरीही आज नारायण राणे साहेब यांच्या अध्यक्षीतेखाली स्थापन केलेल्या समीतीने तात्काळ म्हणजे समिती स्थापन झाल्यापासून तीन महिण्यांच्या आत मराठा आरक्षणाचा निर्णय घेतला जाईल असे सांगितले आहे. आज राजषी शाहू राजांच्या जनमदिनी त्यांना शाहूंच्या विचारांची प्रेरणा मिळावी व मराठा आरक्षणाची मागणी पूर्ण व्हावी.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातीव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटीश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकाम गाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पध्दत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करुन गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वनवन भटकणाऱ्या लोकांना राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करुन समाजात साम ... ाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच.

त्यावेळेस धर्मव्यवस्थेने स्त्रियांना अतिशय उपेक्षित ठेवले. त्यांचे हक्क, अधिकार, नाकारले, स्त्री म्हणजे केवळ चूल व मूल या पुरतीच मर्यादित ठेवली त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची अतिशय विचित्र पध्दत आपल्या देशात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करुन ही पध्दत बंद पाडली. जातीभेदाचे प्रस्त नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा धनगर विवाह घडवून आणले. विधवांसाठी विधवा पुनर्विवाह कायदा लागू केला. त्यामुळे आपला काहीही दोष नसताना आयुष्यभर विधवा म्हणून जगावे लागणाऱ्या स्त्रियांना पुनर्विवाह करून आपले दु:ख दूर करणे शक्य झाले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला. परंतु आज एकविसाव्या शतकामध्ये आणि लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये मात्र स्त्रिभ्रूणहत्या, हूंडाबळी सारख्या अनेक माध्यमातून स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात बळी दिला जात आहे. आज स्त्रीयांना या संकटातून बाहेर काढावयाचे असेल तर राजषी शाहूंचा स्त्रिविषयक व्यापक दृष्टीकोनच आपण स्विकारणे ही काळाची गरज आहे.

राजषी शाहू राजांना बहूजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशूत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी औषध म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला उध्दार होणार नाही. हे राजषीनी ओळखले होते. म्हणूनच ६८ सप्टें. १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला.ङ एवढेच नाही तर ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळांची निर्मित केली. आणि एवढ्यावरही महाराज थांबले नाहीत तर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली.

आज स्वातंत्र्याच्या ६७ वर्षानंतरही आपल्या देशात शिक्षणाची किती बिकट आवस्था आपण पाहत आहोत. या देशाच्या एकूण बजेटपैकी केवळ ३ % शिक्षणावर खर्च केले जातात. आणि एकीकडे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असे सांगितले जाते परंतु त्याचे प्रत्यक्ष कायद्यात रूपांतर करून तो कायदा किती प्रभावी पध्दतीने राजर्षीनी पाळला, ते चित्र आज आपणास पहावयास मिळत नाही. कारण आज शिक्षण खत्रातील विविध बदलांसंबंधी रोज एक नवा शासन निर्णय निघत राहतो परंतु प्रत्यक्ष अमंलबजावणी मात्र तेवढ्या प्रभावीपणे झालेली पहावयास मिळत नाही. कारण एकीकडे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत म्हणायचे आणि दूसरीकडे मात्र अगरी ३ वर्षाच्या मुलांना लाखांवर फिस आकारायची हे विरोधी भासात्मक वास्तव आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत.

राजषी शाहूंनी त्याकाळी गोरगरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून कोल्हापूर संस्थानात अनेक वसतीगृहांची निर्मिती केली. एवढेच नव्हे तर स्वत:च्या राजवाड्यात सुध्दा वसतीगृह सुरू करून मुलांना राहण्याची व जोवण्याची सोय करून दिली. त्यामुळे गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण घेणे अगदी सुलभ झाले. आज मात्र महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून समाजकल्याण खात्याअंतर्गत वसतीगृह चलवली जात आहेत. त्या वसतीगृहाची संख्या अतिशय नगन्य स्वरूपात असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करून त्यामध्ये गोरगरीबांच्या मुलांना अत्याधुनिक सोयीसुविधांनी निर्माण हाव्हेव असे वाटते.

शाहू राजांनी उद्योगधंदे उभारण्याच्या दृष्टीने खास प्रयत्न केले. कारागीरांना आश्रय दिला. आपल्या संस्थानात सुतगीरणी चालू केली. त्यासाठी मोठी जमीन मोफत दिली. इचलकरंजी येथे जिनिंग कारखाना सुरु केला. त्यानंतर इतर ठिकाणी अशा प्रकारचे कारखाने सुरुकेले.

उद्योगधंदे व व्यापारावाढीसाठी शाहूंनी कारागीरांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या. त्यांना राहण्यासाठी जमीनी दिल्या. बिनव्याजी कर्जे दिली. पाणी पुरवठ्याची मोफत सोय केली. रस्ते बांधले, रेल्वेच्या विकासास गती दिली. १८९५ साली शहापूरी ही व्यापारपेठ वसवून उद्योगधंद्याला भरभराटी प्राप्त करून दिली.

राजांनी त्याकाळी पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन राधानगरी नावाचा प्रकल्प उभा केला. जेणेकरून भविष्यात माझ्या रयतेला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही ही दूरदृष्टी ठेवून राधानगरी धरणाची निर्मिती केली. त्याच शाहू राजांचा महाराष्ट्रामध्ये आज मात्र कोट्यावधी रूपयांच्या सिंचनघोटाळ्याचेच प्रकार निर्माण होताना दिसून येत आहेत.

आज शाहू राजांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या सर्वत्र साजऱ्या केल्या जातात. परंतु केवळ एवढ्याने त्यांच्या विचार व कार्याचे चिज होणार नाही. शाहूंचा लढा हा समतेसाठी होता. आत्मसन्मासाठी होता. वर्णवर्चस्वाच्या अहंकारी प्रवृत्ती विरुध्द होता. आज शाहू राजांच्या नंतर मात्र त्यांचाच जयजयकार करणारे त्यांच्या नावाने सत्ता भोगणारे राज्यकर्ते गरीब प्रजेला छळत आहेत. भ्रष्ट्राचार, गुंडगीरी या प्रवृत्ती फोफावल्या आहेत. शाहू राजे फक्त जयंती व पुण्यतिथी पुरते मर्यादित केले आहे. त्यांचा वारसा, विचार, कार्य आपण विसरलो आहोत. राजषी शाहूंनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कायदे केले. प्रसंगी टिका, अपमान, बदनामी यांची पर्वा केली नाही. पण आजच्या राज्यकर्त्यांना जादूटोना व अघोरी प्रथेविरुध्द कायदा भिती वाटते. राज्यकर्ते शाहूंच्या नावाने राजकारण करतात. मात्र त्यांचा विचार जपतांना घाबरतात. ही दूर्दैवी बाब आहे.

शाहू राजांच्या कार्याचे खरे चिज व्हावे असे वाटत असेल तर बहूजन समाजाने शिक्षण घेऊन उच्च पद हस्तगत केली पाहिजेत. आपल्या अधिकाराचा व पदाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाकरिता केला पाहिजे. उपेक्षीत वंचीतांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, जातीभेद नष्ट करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे ही शाहू राजांची अपूर्ण राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सर्वांनी संकल्प करुया आणि खऱ्या अर्थाने २६ जून हा शाहू महाराजांचा जन्मदिन सामाजिक न्याय दिन म्हणून जरा करु या. शाहू राजांच्या कार्याला आणि विचाराना विनम्र अभिवादन

**शिवश्री कामाजी पवार**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४ कोटीची थकबाकी

**गोंदिया:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत शहरात पाणी पुरवठा योजना राबविल्या जात आहे. शहरातील नळधारकांना दिवसातून दोन वेळा पाणी पुरवठा केला जातो. मात्र, अनेक नळधारकांनी काही वर्षापासून पाणी बिल न भरल्यामुळे थकबाकीची रक्कम चक्क १४ कोटी ७४ लाख २३ हजारांवर जाऊन पोहोचली आहे. थकबाी रक्कमेची वसुली मागील वर्षानुसार केवळ ३ कोटी ८१ लाख ५१ हजार झाली आहे. त्यामुळे प्राधिकरण विभागावर थकबाकीचा डोंगर उभा झाला आहे. याचा मुख्य कारण म्हणजे मजिप्रा विभागात कमी कर्मचाऱ्यांची संख्या असून कामाचा भार काहीच कर्मचाऱ्यांवर आला आहे. नळधारकांनी थकीत बिलाची रक्कम भरण्याचा आर्त टाहो प्राधिकरण विभाग करीत आहे.

शहरात प्राधिकरणाचे १५ हजार ७४९ नळधारक आहेत. ही संख्या काही वर्षापुर्वी अधिक होती. मात्र, नवीन घर बांधकामाचे कार्य तीव्र गतीने वाढल्याने नागरिक आपल्या घरीच बोअरवेल खोदत आहेत. दिवसातून केवळ दोनच वेळा नळाचे पाणी मिळत असल्याने अनेक ग्राहकांनी आपले कनेक्शन बंद केले. विशेष म्हणजे शहरातील अनेक ग्राहकांनी अनेक वर्षापासून मजिप्राचे बिलच भरले नाही. त्यामुळे बिलाची थकबाकी वाढतच चालली. जेव्हा मजिप्राचे अधिकारी व कर्मचारी बिलाची रक्कम मागण्याकरिता जातात तेव्हा अनेक ग्राहक अरेरावी करीत असतात. त्यामुळे त्यांचे कनेक्शन कट करावे लागते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे कामाचे भार वाढले असून अनेक कामे विलंबाने होत आहेत. शहरात १५ हजारांच्यावर कनेक्शनधारक असून सन २०१८-१९ मध्ये थकबाकीची रक्कम १३ कोटी ६६ लाख १४ हजारावर पोहोचली होती. आजघडीला ती रक्कम १४ कोटी ७५ लाख २३ हजारांवर पोहोचली आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर थकबाकीची वसुली कशी करावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

कर्मचारी कमी असल्यामुळे मजिप्राचे अनेक कामे होत नाहीत. तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्त होतात त्यांच्या जागा ही भरण्यात येत नाहीत. त्यामुळे कामाचा अधिक भार वाढत आहे. तसेच वसूली करणेही कठिण झाले आहे. तर कोरोनाच्या काळातही वसुली करता आली नसल्याचे मजिप्राचे उपविभागीय अभियंता राजेंद्र मडके यांनी सांगितले.




**मागील पाच वर्षाची थकबाकी व वसुली**

| वर्ष | थकबाकी | वसुली |
|---|---|---|
| 2015-16 | 10,98,75,000 | 3,37,66,000 |
| 2016-17 | 11,58,05,000 | 3,81,68,000 |
| 2017-18 | 12,36,51,000 | 4,02,57,000 |
| 2018-19 | 13,66,14,000 | 3,81,51,000 |
| 2019-20 | 14,75,23,000 | 3,01,41,000 |

**३५१ ग्राहक कोट्यावधी थकबाकी**

धनाढ्य व गरीब नागरिकांना नळाचे कनेक्शन देण्यात आली. मात्र धनाढ्य लोक बील भरत नसून आजही त्यांच्यावर मजिप्राचे ५० हजारांच्यावर म्हणजेचे १ कोटी ७५ लाख ५० हजार एवढी थकबाकी आहे.

**८ पदे रिक्त**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे शहरातील मुख्य कार्यालय असून यांच्यावर पाणी पुरवठा, बिल वाटप, वसुली असे अनेक कामे असतात. मात्र कार्यालयात शाखा अभियंत्यांच्या ३ पदापैकी १ पद भरण्यात आली असून तेही तिरोडाचे काम पाहत आहेत. तर वरिष्ठ लिपीकाचे १ पद, कनिष्ठ लिपीकचे २ व शिपाईचे २ पदे असे एकुण ८ पदे रिक्त आहेत.

# घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पुन्हा वेटिंगवर

**गोंदिया:** घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नसल्यामुळे अडचणीत असलेल्या गोंदिया नगर परिषदेने सोनपुरी येथील जागा खरेदी करण्याचा प्रस्तावर मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेत मांडला होता. मात्र या विषयावर उपाध्यक्ष शिव शर्मा यांनी वेळ मागितल्याने जागा खरेदीचा विषय रेंगाळला आहे. त्यामुळे आता हा विषय आणखी किती दिवस रेंगाळतो याकडे सर्वाच्या नजरा लागल्या आहेत.

तीन महिन्यांच्या कालावधीनंतर नगर परिषदेची सर्वसाधारण सभा १९ जून रोजी कुंभारेनगर येथील सभागृहात पार पडली. या सभेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी ग्राम सोनपुरी येथे जागा खरेदीचा प्रस्तावर मांडण्यात आला होता. मात्र हा विषय आपल्या विभागाशी संबंधित असल्याने याला समजून घेण्यासाठी वेळ मागितला व त्यानंतरच सभेने अंतिम निर्णय घ्यावा असे सूचविले. या विषयावर लवकरच सभा घेऊन त्यात हा विषय मांडला जाणार व निर्णय घेण्याचे ठरले. याशिवाय मच्छी मार्केट परिसरातील पार्कींग आरक्षणामध्ये बदल करुन तेथे शॉपिंग कॉम्पलेक्स व पार्कींग तयार करणे, नगर परिषदेची हद वाढविणे या विषयांनाही मंजूरी देण्यात आली. विशेष म्हणजे सभेत नगर परिषद सदस्य सुनील तिवारी यांनी निर्मल टॉकीजच्या शेजारी येत असलेल्या केएमजे हॉस्पीटल मार्गावरल एका तुकड्याचा बांधकामाचा विषय मंडला. त्यांनी मागील ३ वर्षापासून या कामासाठी पाठपुरावा करुनही काम होत नसल्याबाबत रोष व्यक्त केला. तसेच नियोजन व बांधकाम विभागाकडून सर्वेक्षण करून रस्त्याचे बांधकाम करुन देण्याची मागणी केली. यावर लवकरच कारवाई करण्याबाबत ठरले. त्याचप्रकारे पंकज यादव यांनी नगर परिषद कर्मचाऱ्यांना होमीयोपॅथिक औषधीचे वाटप करण्याची मागणी केली. यावर मुख्याधिकारी चंदन पाटील यांनी याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन त्यानंतरच पुढील कारवाई करणे शक्य होणार असे सांगितले.



**भुयारी गटर योजना सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी व आमदारांना निवेदन**

गोंदिया नगर परिषदेच्यावतीने शहरात सांडपाणी वाहून नेण्यासाठी भुमीगत गटार योजना मंजूर करण्यात आली आहे. मात्र अद्यापही त्या कामाला सुरुवात झालेली नसल्याने नगरसेवक अफसाना मुजीब पठान व अनिता सतीश मेश्राम यांनी आमदार विनोद अग्रवाल व उपजिल्हाधिकारी तसेच नगराध्यक्ष, नगर परिषद मुख्याधिकारी व उपाध्यक्षांना निवेदन सादर करीत योजना लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी केली.

# ककोडी मार्गाने होते अवैध वाहतूक

**ककोडी:** राष्ट्रीय महामार्गावर सीमा शुल्क तपासणी नाका आहे. याठिकाणी पोलीस आणि इतर विभागाचे अधिकारी तैनात असतात. त्यामुळे अवैधरित्या होणारी वाहतूक या ठिकाणावरुन करण्यात येत नाही. यावर उपाय म्हणून महाराष्ट्रातून छत्तीसगडकडे आणि छत्तीसगडातून महाराष्ट्रात होणारी वाहतूक जंगलव्याप्त नक्षलग्रस्त ककोडी परिसरातून करण्यात येते. प्रशासनाने ही वाहतूक रोखण्याकरिता हाईट बेरिअर बसविले. मात्रते बेरिअर तोडून वाहतूक सुरु करण्यात आली. परिणामी ही बेबंदशाही रोखणार तरी कोण? असा सवाल उपस्थित होत आहे.

तालुक्यातील ककोडी ते चिचगड मार्गावर ओव्हरलोड वाहनांची वाहतूक गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. हा मार्ग महाराष्ट्र आणि छत्तीसगड या दोन्ही राज्यांना जोडतो. हा मार्ग जंगलव्याप्त व नक्षलग्रस्त असल्याने अवैधरित्या वाहतूक करण्याकरिता या मार्गाला पसंती देण्यात येते. हा प्रकार प्रशासनाला देखील माहित आहे. हा प्रकार थांबविण्याच्या उद्देशाने ककोडी-चिचगड मार्गावर हाईट बेरिअर बसविण्यात आला आहे. मात्र तस्करांनी बेरिअर तोडून आपला गोरखधंदा सुरु ठेवला आहे. जनावरांची तस्करी, अवैधरित्या होणारी इतर साहित्याची वाहतूक व शिरपूर येथे तयार करण्यात आलेला चेकपोस्ट, नाका चुकविण्याच्या उद्देशाने या मार्गावरुन रात्रभर वाहतूक केली जाते.



जनावरांच्या वाहतुकीकरिता हा मार्ग प्रसिद्ध आहे. अनेकदा पोलीस विभागाने कारवाई देखील केली. मात्र विभागातीलच काही धृतराष्ट्रांमुळे ह गोरखधंदा फुलत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. या प्रकारावर आळा घालण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

# जीवंत बाळला पुरले मातीत

**चिचगड:** देव तारी त्याला कोण मारी, अशी म्हण आहे. असाच प्रकार तालुक्यातील वांढरा परिसरात घडला. जिवंत नवजात अर्भकाला जंगलात खड्ड्यात टाकून मातीने खड्डा बुजवून अज्ञात व्यक्तींनी पळ काढला. बाळ रडत असल्याने सकाळी फिरण्यास गेलेल्या नागरिकांच्या लक्षात हा प्रकार आाल. तातडीने याची माहिती पोलिसांना देवून त्या बाळाला रुग्णालयात नेण्यात आले. सध्या त्या बाळावर गोंदियात उपचार सुरु असून पोलीस त्याला जंगलात टाकणाऱ्यांचा शोध घेत आहेत. हा हृदय हेलवून सोडणाऱ्या घटनेमुळे तालुक्यातील एकच खळबळ उडाली.

सविस्तर असे की तालुक्यातील वांढरा परिसर जंगलव्याप्त आहे. या परिसरातील व्यक्ती (दि.२०) सकाळी फिरण्याकरिता जंगल परिसरात गेले. दरम्यान त्यांना रस्त्याच्या कडेला एका बाळाच्या रडण्याचा आवाज कानावर पडला. नागरिकांनी आजूबाजूला बघितले असता कोणीही आढळले नाही. मात्र बाळ सातत्याने रडत असल्याने नागरिकांनी जंगलात जावून बघितले असता मातीच्या खड्ड्यातून रडण्याचा आवाज येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. लगेच त्यांनी माती उकरुन बघितली असता एक नवजात बाळ असल्याचे समजले. तातडीने त्या बाळाला मातीतून बाहेर काढून चिचगड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता नेण्यात आले. डॉ. भोंगाडे यांनी बाळावर प्राथमिक उपचार केला. पोलिसांनी देखील या प्रकरणाची नोंद घेतली. बाळाला पुढच्या उपचाराकरिता गोंदिया येथील बाई गंगाबाई रुग्णालयात पाठविण्यात आले. चिचगड पोलीस बाळाला मातीच्या ढिगाऱ्यात फेकणाऱ्याचा शोध घेत आहेत. जन्मदात्यांनी नकोसा असलेल्या बाळाला मारण्याच्या उद्देशाने मातीत पुरले मात्र नागरिकांच्या सतर्कतेने त्या बाळाचा जीव वाचल्याने देव तारी, त्याला कोण मारी या उक्तीचा परिचय आला. या प्रकरणाचा तपास चिचगड पोलीस ठाण्याचे ठाणेदार अतुल तवाडे करीत आहेत.

## विद्युत धक्याने चिचगड परिसरात दोघांचा मृत्यू

**चिचगड:-** चिचगड पोलीस ठाणेंतर्गत रविवारला ओमेश साखळ(रा.उचेपूर) या २४ वर्षीय युवकाचा विद्युत शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली तर सोमवारल झाशीनगर येथे विद्युत खांबाच्या अर्थिंगतारेला हात लागल्याने निताराम त्र्र्री मेश्राम(वय ४२) याचा शेतशिवारात मृत्यू झाल्याची घटना घडली.मेश्राम यांच्या मागे २ मुले व आप्तपरिवार आहे.

मेश्राम ज्या शेतशिवारात गेले त्याठिकाणावरुन उच्चदाबाची विद्युत वाहिनी कमी दाबाची विद्युत वाहिनीचे तार गेले असून एक तार तुटून पडल्याने त्याचा अर्थिंगशी संपर्क आल्याने ही घटना घडल्याचे बोलले जाते.

# "त्या" पोलीस कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करा

**गोंदिया:** येथील इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे वृत्तवाहिनी पत्रकार सतीश पारधी व त्यांचा मुलगा सन्नी पारधी यांच्या राहत्या घरी कोणतीही पुर्वसुचना न देता मध्यरात्री दरम्यान काही पोलीस कर्मचाऱ्यांनी भेट देवून मानसिक त्रास दिल्याची घटना ४ जून रोजी घडली होती. या प्रकरणी सतीश पारधी यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना तक्रार करुन त्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी केली होती. मात्र, अद्यापही कार्यवाही करण्यात आली नसून त्या पोलीस कर्मचाऱ्यांना अभय दिले जात आहे. या प्रकरणाला घेवून भारतीय कम्युनिस्ट पार्टी (भाकप)च्यावतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करुन या प्रकरणी कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.



इलेक्ट्रॉनिक मिडीयात काम करणारे पत्रकार व छायाचित्रकार सतीश पारधी यांच्या कृष्पुरा वॉर्ड व मुलगा सन्ना यांच्या रामनगर येथील राहत्या घरी ४ जूनच्या मध्यरात्री अचानक पोलिसांनी धडक दिली. दरम्यान सतीश पारधी यांचा मुलगा सन्नी यांच्या नावे आवाज दिला. दरम्यान या संदर्भात विचारणा केली असता कोणतीही समधानकारक उत्तरे न देता पोलीस दंडुकेशाहीचा परिचय देण्यात आला. या प्रकाराची माहिती घेण्याकरिता ५ जूनला रामनगर पोलीस ठाण्यात गेले असता पोलिसांकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे प्रकाराला विविध प्रसारमाध्यमांच्या पत्रकाराच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. तसेच पोलिसांचा आकस्मिक येण्याचा हेतु काय? असा प्रशन उपस्थित करुन त्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना दिले होते.

परंतु या प्रकरणी वरिष्ठांकडून त्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कार्यवाही न करता त्यांना अभय दिले जात असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी भाकपच्यावतीने मुख्यमंत्र्यांना तक्रार करण्यात आली असून प्रकरणाची चौकशी करुन दोषी पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात यावेश अशी मागणी भाकपच्यावतीने करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या बोनससाठी १६० कोटी प्राप्त

**गोदिया:** भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचा अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला बोनस मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार प्रफुल पटेल यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी १६० कोटी रुपये मंजूर करवून घेतले आहे. हा निधी संबंधित जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाला असून लवकरच बोनसचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.



राज्य शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी पाचशे रुपये बोनस जाहिर केला होता. परंतु हिवाळी अधिवेशनात खासदार प्रफुल पटेल यांच्या निवेदनावर राज्य शासनाने दोनशे रुपये बोनस वाढविण्याची घोषणा केली होती. अशाप्रकारे धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी सातशे रुपये प्रति क्विंटल बोनस जाहिर झाला.


शासनाने जाहिर केलेल्या बोनस (खरीप हंगाम २०१९-२० साठी) यापूर्वी मिळालेला निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वळती करण्यात आलेली आहे. त्यानंतरसुद्धा भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बोनसची निधी शासनाकडे प्रलंबित आहे. खासदार प्रफुल पटेल यांनी पुन्हा राज्य शासनास पत्रव्यवहार केला व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेशी प्रलंबित बोनस तातडीने देण्यासंबंधी चर्चा केली.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन मुंबईकडून १७ जून रोजी गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बोनस देण्यासाठी गोंदिया जिल्हा मार्केटींग अधिकारी यांच्याकडे ५६.३४ कोटी व भंडारा जिल्हा मार्केटींग अधिकारी यांच्याकडे १०३.६५ कोटींची रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे.

त्यामुळे ज्या धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनसची रक्कम मिळालेली नाही त्यांना लवकरच बोनसची रक्कम मिळणार आहे. रबी हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केलेल्या धानाचे चुकारे करण्यासाठी गोंदिया जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे १३४.७६ कोटी व भंडारा जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे ४२.८९ कोटींची रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे.

# जखमी बिबट्या अडकला पिंजऱ्यात

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील बोडगावदेवी वनक्षेत्रांतर्गत सोनेगाव - तिडका मार्गावरील बोदरा कक्ष क २७९ मध्ये सोमवारला १२ वाजेच्या सुमारास जखमी बिबटला जेरबंद करण्यात आले. सध्या त्याला नवेगावबांध येथील वनविभागाच्या परिसरात नेण्यात आले आहे. प्राथमिक उपचारानंतर त्याला गोरेवाडा ( नागपूर )येथे हलवले जाणार आहे. या बिबट्याला पकडण्यासाठी गोंदिया वनविभागाच्या शीघ्र कृती दलाने तब्बल दोन तास परिश्रम घेतले. तो नेमका कशामुळे जखमी झाला ते वैद्यकीय परिक्षणानंतर कळणार आहे.



सोनेगाव - तिडका मार्गावर बिबट जखमी असल्याची माहिती वनविभागाला मिळाली. लगेच वनपरिक्षेत्र अधिकारी बी.टी.दुर्गे आपल्या सहकाऱ्यांसह बोदरा जंगलाकडे रवाना झाले. रस्त्याच्या कडेला असलेल्या टीसीएम नालीत बिबट बसलेला दिसून आला. त्याची हालचाल होत नसल्याने तो जखमी झाला असावा असा तर्क काढण्यात आला. काही वेळातच त्याने समोरच्या पायांचा आधार घेत सरपटत नालीचा उंचवटा ओलांडला. त्याच्या या हालचालीवरून तो पायाने चालू शकत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर शीघ्र कृती दलाला पाचारण करण्यात आले. शीघ्र कृती दल घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पिंजऱ्यात अडकविण्यावर शिक्कामोर्तब केले. लगेच नवेगावबांध येथून पिंजरा बोलावण्यात आला व त्या बिबटला अलगद पिंजऱ्यात कैद करण्यात शीघ्र कृती दलाला यश आले.

या बिबटचे वय सुमारे अडीच ते तीन वर्षे असून वाहनाच्या धडकेत, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात की आजारपणामुळे जखमी झाला ते अद्याप स्पष्ट झाले नाही. यावेळी बिबट बघण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती. मोहीम यशस्वी करण्यात वनपरिक्षेत्र अधिकारी बी टी दुर्गे, क्षेत्र सहाय्यक उमेश गोटेफोडे, वेलतुरे, शीघ्र कृती दलाचे क्षेत्र सहाय्यक राजेंद्रसिंग बहुरे, मिथुन चव्हाण, चंद्रकांत गोडे, प्रवीण केळवतकर, दीपक बरडे, मुकेश सोनवाने, धार्मिक तसेच वन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# गायी व म्हशी फक्त कालवडींनाच जन्म देणार

**तिरोडा :** अदानी फाऊंडेशनच्यावतीने पशुधन विकास, दुग्ध व्यवसाय आणि शाश्वत पशुधनावर आधारीत उदरनिर्वाहाचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहे. यातंर्गत जनावरांचे कृत्रिम रेतन केले जात आहे. या तंत्रांतर्गत गार्यीमध्ये कालवडींना जन्म देण्याची ९० टक्के शाश्वती असते.दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी जिल्ह्याचे भौगोलिक वातावरण अनुकूल आहे.




जिल्ह्यात पशुपालकांची टक्केवारी वाढली आहे. सोबतच अदानी फाऊंडेशनने २ पशुधन विकास केंद्रांची पशुधन सेवा २६ गावांमध्ये कार्यरत आहे. या २६ गावांमध्ये ७०६० जनावरांपासून किमान प्रतिदिन १० हजार ७६ लिटर दुधाचे उत्पादन होते. यामुळेच दुग्ध उत्पादनात तिरोडा तालुका प्रगतीपथावर आहे.दुग्ध व्यवसायासाठी कालवडीची उपयुक्तता ही खोंड बैलापेक्षा जास्त आहे. परंतु सद्यस्थितीत गावामध्ये नर व मादी वासराला जन्म देण्याचे प्रमाण ५०:५० आहे.

जर खोड जन्मला तर त्याची उत्पादकता कमी होते व अनुत्पादक जनावर पशुपालकांवर ओझे बनलेले आहे. तसेच कालवडीची मागणी ही जास्त प्रमाणात दिसून येते.यासाठी अदानी फाऊंडेशनने जनावरांचे कृत्रिम रेतन करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यामध्ये प्रक्रिया केलेल्या वीर्य कांड्यांचा वापर गाभण राहिलेल्या गार्यीमध्ये करतात. यात कालवडींना जन्म देण्याचे प्रमाण ९० टक्के असते व जे परंपरागत पद्धतीने केवळ ५० टक्के असते. या वीर्य कांड्यांचा वापर २००४ सालापासून अमेरिका व ब्राझील देशात होत आहे.

फ्लो स्पाईटोमीटर नावाच्या साधानाने कृत्रिम रेतन केले जाते. याचा फायदा शेतकरी व पशुपालकांना होतो. त्यात कळपाची वाढ झपाट्याने होते व दूध उत्पादनात वाढ होते.उपलब्ध चाऱ्याचा किफायतशीर वापर, खोंड जन्माला येण्याचे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे चात्त्र्याचीही बचत होते.

अदानी फाऊंडेशनने ही सेवा विनामुल्य प्रदान करीत आहे. बीएआयएफ ही अंमलबजावणी करणारी एजन्सी म्हणून गावात कार्यरत आहे. यावर्षी सन २०२०-२१ मध्ये २५६ रेतन करण्यात आले. तर एक हजार जनावरांचे रेतन करण्याचे लक्ष्य फाऊंडेशनने ठेवले आहे. या यशासोबतच जिल्ह्यात उत्पादक देशी गार्यींची प्रख्याती वाढविण्याचे उद्दिष्ट अदानी फाऊंडेशनने ठेवले आहे. फाऊंडेशनने स्थानिक गाई व म्हशींमध्ये उत्पादकता सुधारणा करुन शेतक?ऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे अतिरिक्त स्त्रोत म्हणून तिरोडा ब्लॉकमध्ये दुग्ध व्यवसाय विकास करण्याचा निर्धार केला आहे. पशुधन विकासासोबतच फाऊंडेशन दुग्ध व्यवसायावर आधारीत उपजिविका प्रशिक्षण कार्यक्रमही राबवित आहे.

यामध्ये देवलापार येथील गौ-विज्ञान अनुसंधान केंद्रामार्फत ४६७ गायी व बैल मोफत देण्यात आले. सोबतच दोन हजार ५७३ शेतकत्त्र्यांना सेंद्रिय किटकनाशके आणि जैव इंझाइम तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. दुग्ध विकास विकासासाठी चांगल्या प्रतिच्या ए-२ दुधाच्या उत्पादनासाठी देशी गायीच्या जातीला प्रोत्साहन देण्यासाठी त्यानुसार एकूण ३० थारपारकर देशी गायी व बैल पुण्याहून अदानी फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रगतीशिल महिला शेतकरी उत्पादकांनी खरेदी केली.जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालनाचा पर्याय उपलब्ध करुन दिला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातून विकास साधने शक्य होत आहे.

**२ पशुधन विकास केंद्रांची स्थापना**

सन २०१७ मध्ये अदानी फाऊंडेशनने तिरोडा तालुक्यातील ग्राम खैरबोडी आणि कवलेवाडा येथे २ पशुधन विकास केंद्रांची (एलडीसी) स्थापना केली.ज्याचा फायदा जवळपासच्या २६ गावांना होत आहे. दोन्ही केंद्र पशुधन आरोग्य सेवा नि:शुल्क सेवा प्रदान करतात. ज्यात कृत्रिम रेतन गर्भधारणा, रोगनिदान, पशु आरोग्य तपासणी शिबिर, प्रशिक्षण, बियाणे वितरण व चार डेमा यो सेवांचा समावेश आहे. आतापर्यंत २५५४ एआय, २५६ एसएसएसएआय, २१८३ गर्भधारणा निदान आणि १६२२ गर्भधारणेची पुष्टी पूर्ण केलल्या आहे. एकूण परिणाम म्हणून ८७३ देशी जातीच्या वासरांचा यशस्वीरित्या गावांमध्ये जन्म झाला आहे.

# ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश मिळणार



**गडचिरोली:** समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळा मधील वर्ग १ते ८ पर्यतच्या सर्व विद्यार्थिनी व एससी, एसटी, एनटी/ व्हीजे, व बीपीएल प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो.हण ओबीसी व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी मात्र गणवेशापासून वंचित राहत असल्याने या विद्यार्थ्यांनाही गणवेश देण्याची मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने जिल्हा परिषद अध्यक्षांना निवेदन देत करण्यात आली.

एकाच बाकावर बसणाऱ्या विविध प्रवर्गातील मुलांमधील गणवेशामुळे निर्माण होणारी दरी व न्यूनगंडता टाळण्यासाठी वर्ग १ ते ८ पर्यतच्या ओबीसी व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सुद्धा गणवेश देण्यात यावे यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने गडचिरोली जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार व शिक्षण सभापती मनोहर पाटील पोरेटी यांची आज भेट निवेदन सादर केले. त्यावेळी जिल्हा परिषद शाळांमधील १ ते ८ पर्यत शिक्षण घेणाऱ्या ओबीसी व खुल्या प्रवर्गातील सर्वच विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचे ठोस आश्वासन दिले. जिल्हा परिषद शाळांमध्ये बहुतांश गरीब कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. यामध्ये सर्वच समाजातील विद्यार्थ्यांचा समावेश असतो, त्यांच्याकडे गणवेश खरेदीसाठी पैसे नसतात. यंदा कोरोणामुळे सरकारी तिजोरीवर परिणाम झाला आहे जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या अनुदानामध्ये कपात होण्याची शक्यता आहे. हे जरी असले तरी विद्यार्थ्यांना प्राथमिकता देऊन ओबीसी व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासाठी निश्चित आर्थिक तरतूद करण्याचे आश्वासन जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार व शिक्षण सभापती मनोहर पाटील पोरेटी यांनी शिष्टमंडळाला दिले.

निवेदन देतांना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जीवन पाटील नाट, जिल्हा परिषद सदस्य विनोद लेनगुरे, संजय चरडूके, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष दादाजी चुधरी, सचिव प्रा. देवानंद कामडी. कार्याध्यक्ष विनायक बांदुरकर उपस्थित होते.

# वरिष्ठांना डावलत जि.प.सामान्य प्रशासनाने केल्या पदोन्नत्या

**गोंदिया**:–जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाला आत्ता हळूहळू जाग येऊ लागली असून गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या पदोन्नती प्रकरणाला निकाली काढण्यास सुरवात झाली आहे. पदोन्नती प्रकरणाला घेऊन बेरार टाईम्स सातत्याने प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न करीत आहे. त्यातच १८ जून रोजी काही पदोन्नतीची प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.



मात्र पदोन्नती देतांना ज्यांना पदोन्नती देण्यात आली,त्यांच्यापेक्षा अनेक वर्षापासून कार्यरत असणारे वरिष्ठांना मात्र डावलण्यात आल्याने पदोन्नतीसाठी जी यादी तयार करण्यात आली,त्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी महेश केंद्रे यांच्याकडे हा प्रभार असून त्यांनी चुकीच्या पध्दतीने आणि आकसपुर्ण यादी तयार केल्यामुळेच पदोन्नती मिळालेल्यांपेक्षा अनेक वरिष्ठ अद्यापही असतांना त्यांना का डावलण्यात आले यावर खलबत्ते सुरु झाले आहेत.

या सर्व प्रकरणामुळे सेवा जेष्ठता यादीत मोठा घोळ करण्यात आला असल्याचे स्पष्ट झाले आहे.वरिष्ठ सहाय्यकांना कनिष्ठ प्रशासन अधिकारी तर लिपिक वर्गियांना वरिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नती मिळालेल्यामध्ये अर्जुनी मोरगाव पंचायत समितीचे एस.के.तिवारी यांना पदोन्नतीवर गोरेगाव पंचायत समिती,नोकरीला कधीही इमानेइतबारे न करणारे सौरभ अग्रवाल यांना आमगाव पंचायत समिती,सामान्य प्रशासन विभागातील जंयत खोटेलेंना लघुपाटबंधारे विभाग तर सामान्य प्रशासन विभागातीलच कु.चित्रा ठेंगरी यांना त्याच कार्यालयात ठेवण्यात आले आहे. तर वरिष्ठ सहाय्यक पदावर सामान्य प्रशासन विभागात अजय खरवडे, सुरेंद्र सुर्यवंशी यांना अर्जुनी मोर तर हेमराज सुर्यवंशी यांना सामान्य प्रशासन विभागात पदोन्नती देण्यात आली आहे.

या सर्वांना पदोन्नती मिळाली असली तरी यांच्यापेक्षा नोकरीत अधिक वर्ष झालेलेही काही कर्मचारी आहेत,त्यांना मात्र या पदोन्नतीतून डावलण्यात आल्याने त्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी तयार करतांना जाणीव पुर्वक सामान्य प्रशासन विभागाने आकस ठेवल्याचेच दिसून येत आहे.

# मत्स्यबीजोत्पादनात गोंदिया विभागात अव्वल

**गोंदिया:** वर्षभरात ३४४ कोटी मत्स्यबीजाचे उत्पादनगोंदिया : तलावांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यात मत्स्य उत्पादनाला अनुकूल स्थिती आहे. यामुळेच जिल्ह्यात सन २०१९-२० या वर्षात सुमारे ३४४ कोटी मत्स्यबीज उत्पादन करुन जिल्ह्याने नागपूर विभागात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. हे अव्वल स्थान कायम राखण्यासाठी सन २०२०-२१ या वर्षातही गोंदिया जिल्हा मत्स्य व्यवसाय विभागाने कंबर कसली आहे.

गोंदिया जिल्ह्यात अनेक प्रकल्प, तलाव आहेत. त्यात मत्स्य पालन केले जाते. गोड्या पाण्यातील माशांना सर्वत्र मोठी मागणी असते. गत वर्षी चांगला पाऊस झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्प, तलाव तुडूंब भरले होते. खरिपातील पिकांना सिंचनानंतर प्रकल्प व तलावांमध्ये ब?यापैकी साठा शिल्लक असल्याने मोठ्या प्रमाणात मत्स्य व्यवसायाला वाव मिळाला. यंदाच्या वर्षासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने तयारी सुरू केली आहे. जिल्ह्यातील १२ तलावांमध्ये मत्स्यबीज उत्पादन व ६९०५ तलावात मत्स्य व्यवसाय करण्याचे नियोजन आहे. सन २०१९-२० या वर्षात ३४४ कोटी मत्स्यबीज उत्पादन करुन जिल्ह्याने नागपूर विभागात प्रथम स्थान प्राप्त केला. पुढील वर्षी हे स्थान कायम राखण्यासाठी जिल्ह्यातील विविध संस्थांच्या माध्यमातून नियोजन सुरू झाले आहे. जिल्ह्यातील भानपूर, भादुली, गिरोला, ताडगाव, खोडशिवणी, बाक्टी, अंभोरासह बारा तलावात मत्स्यबीज उत्पादन करण्यात येणार असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त सपकाळ यांनी सांगितले.

सिंचन विभागाचे ५६ आणि अन्य ६९०५ मालगुजारी तलावांमध्ये मत्स्यबीज टाकण्यात येणार आहे. १३३ मत्स्य व्यवसाय संस्थांच्या माध्यमातून ११०७७ सभासद आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मासेमारी व्यवसायातून चालवितात. यंदाच्या हंगामात चांगला पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे मत्स्य व्यवसायासाठी जिल्ह्यात अनुकूल स्थिती राहणार असल्याचे बोलले जाते.

# रेती घाटांचे उपसा सप्टेंबरनंतरच; जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण

**गोंदिया:** जिल्ह्यातील २८ रेती घाटांचे लिलाव करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने १७ जून रोजी जनसुनावणी घेण्यात आली. जनसुनावणीची अहवाल आता राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर रेती घाटांच्या लिलावाची प्रक्रिया राबविली जाणार आहे. मात्र रेती घाटांचे लिलाव जरी झाले तरी रेतीघाटांवरुन रेतीचा उपसा हा सप्टेंबर महिन्यानंतरच करता येणार आहे. त्यामुळे याचा जिल्ह्यातील हजारो खासगी बांधकामांना फटका बसून घरकुल लाभार्थ्यांना पावसाळा उघड्यावरच काढावा लागणार आहे.



प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मंजुरी अभावी यंदा जिल्ह्यातील रेती घाटांच्या लिलावाची प्रक्रिया लांबणीवर गेली होती. मार्च महिन्यात सर्वत्र कोरोनाचा शिरकाव झाल्याने लॉकडाऊन आणि संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे घरकुलासह इतर शासकीय आणि खासगी कामे पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यानंतर घरकुलासह इतर खासगी बांधकामांची दखल घेत ही कामे करण्यासाठी शासनाने यात काही प्रमाणात शिथिलता देत उपविभागीय अधिकाऱ्यांची परवानगी घेवून ही कामे करण्याची परवानगी दिली. मात्र बांधकामासाठी आवश्यक असलेली रेती मिळत नसल्याने घरकुल लाभार्थ्यांसह खासगी बांधकाम करणाऱ्यांची सुध्दा अडचण झाली. जिल्ह्यातील २८ रेती घाटांचे लिलाव झाले नसल्यामुळे बांधकामासाठी रेती मिळणे कठीण झाले. त्यातच आता पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पावसाळ्यात घराचे बांधकाम करायचे कसे असा प्रश्न बांधकाम करणाऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने रेती घाटांचे लिलाव करण्यापूर्वी १७ जून रोजी यावर सुनावणी घेतली. त्यामुळे या विभागाकडून सूचना प्राप्त होताच निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.

रेती घाटांच्या लिलावाची प्रक्रिया जरी पूर्ण झाली तर रेतीचा उपसा मात्र शासनाच्या नियमावलीनुसार ३० सप्टेंबरनंतरच करता येणार आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांसह खासगी बांधकामे करणाऱ्या लाभार्थ्यांना चार महिने पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# शेतकऱ्यांना १८ तास वीजपुरवठा करा-मनोहर चंद्रिकापुरे

**अर्जुनी मोरगाव** : विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात धानपीक घेतले जाते.धानपिकाला मुबलक पाण्याची गरज असते.पाण्याअभावी कोणत्याही पाण्याअभावी हातचा घास हिरावून घेण्याचे प्रकार अधिक घडतात.सिंचनाचे पाणी उपलब्ध होते मात्र कृषिपंपाना केवळ ६ तास वीजपुरवठा केला जात असल्याने शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या उद्भवत असतात. वेळी अवेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने रात्री-बेरात्री वारंवार शेतक?यांना शेतात पंप सुरू करण्यासाठी जावे लागते.त्यासाठी किमान १८ तास वीजपुरवठा करावा या मागणीचे आ चंद्रिकापुरे यांनी उर्जामंर्त्यांना एप्रिल महिन्यात पत्र दिले होते.मात्र अद्याप समस्या सुटली नाही.त्यांनी २१ जून रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने पाठपुरावा केला. ना राऊत यांनी यावर सकारात्मक उत्तर दिले. मा. आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे निवेदन अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महावितरण मुंबई यांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याकरीता ना?. डॉ. नितीन राऊत यांनी निर्देशीत केले आहे. यामुळे हा प्रश्न निकाली निघण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



शेतक?यांची पीकहानी होऊ नये यादृष्टीने विधानसभा क्षेत्रात किमान १८ तास वीजपुरवठा सुरू ठेवावा असे निवेदन आ मनोहर चंद्रिकापुरे यांनी ऊर्जामंत्री ना नितीन राऊत यांना दिले.

शेतकरी सदैव कुठल्या ना कुठल्या तरी संकटाने ग्रासलेला असतो.कधी कोरडा दुष्काळ तर कधी अवकाळी पाऊस . पाऊस संतुलित आला तर किडीचा प्रादुर्भाव सतावतो. पण बहुतांशी सिंचनाच्या

# गृहमंत्र्यांच्या पालक जिल्ह्यात मोजक्याच होमगार्डना संधी

**गोंदिया**:– मार्च महिन्यापासून राज्यात करोना संसर्गाचा प्रादुर्भाव झाल्याने संचारबंदी लागू करण्यात आली आहे.त्या संचारबंदीमध्ये बंदोबस्तासाठी सुरवातीचे दोन महिने तर होमगार्डना संधीच देण्यात आली नाही.जेव्हा की संचारबंदी काळात पोलिसांवर अधिक ताण असतांनाही त्यांना डावलण्यात आले. मात्र २२ मे पासून या होमगार्डना जिल्ह्यात बंदोबस्तासाठी देण्यात आली ती ४० दिवसासाठी म्हणजे ३० जूनपर्यंत. परंतु राज्याचे गृहमंत्री असलेल्या अनिल देशमुखांच्या पालक जिल्ह्यातच होमगार्ड समादेशक करोनामध्ये बेपत्ता असून होमगार्डना न्याय मिळवून देण्याऐवजी त्यांची तक्रार व त्यांचे मनोबल खचविणाऱ्या कामातच अग्रसर राहिल्याचे चित्र आजपर्यंत बघावयास मिळाले आहे. त्यातच जिल्ह्यात अंदाजे ६८५ महिला पुरुष होमगार्ड असून यापैकी फक्त २०० होमगार्डसंना संधी देण्यात आली आहे, त्यामुळे ४८५ होमगार्डचे काय अशा प्रश्न आता उपस्थित झालेला आहे.



मुंबई सारख्या शहरात वयाची ५३ वर्ष झालेल्या होमगार्डसंनाही संधी देण्यात येते तर गोंदिया जिल्ह्यात मात्र ४०-४५ वयातील होमगार्डसना संधी देण्यात येत असल्याची तक्रारही काही होमगार्डसनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे करुन सर्वांना आळीपाळीने बंदोबस्तासाठी संधी दिल्यास सर्वांनाच रोजगाराची संधी मिळेल अशी भूमिका आहे.मात्र करोना काळात आपल्याशिवाय दुसरे कुणीच चांगले प्रशासकीय काम केले नसल्याचा कांगावा करणाऱ्या जिल्हा प्रशासनाला मात्र जिल्ह्यातील ४८५ होमगार्डसंना आपण न्याय देऊ शकलो नाही याची कुठेच चिंता नाही.

होमगार्डचे समादेशक गावंडे यांचा तर कुठेच पत्ता नसल्याने अशा अधिकाऱ्यावर तत्काळ प्रभावाने कारवाई करुन निलबिंत करावयास हवे ज्यांनी आपल्या अधिनस्त जवानांची काळजी घेण्याऐवजी कार्यालय बंद करुन मी गोंदियातच धन्यता मानली.

गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री हे राज्याचे गृहमंत्री असल्याने त्यांच्या पालक जिल्ह्यात तरी या होमगार्डसंना न्याय मिळेल कामाची संधी मिळेल अशी जी अपेक्षा होती,ती नेहमीप्रमाणेच काही चमचेगीरी करणाऱ्यामुळे हातातून गेली आहे.आपले पोटं भरलं इतरांच नाही भरले तरी चालेल या वृत्तीचे काही होमगार्डस गोंदिया जिल्ह्यात असल्यानेच समादेश गावंडेसारख्यांचे फावत असल्याचेही बोलले जात आहे.

# प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांमुळे कामकाजावर परिणाम

**गोरेगाव**: ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र ही ग्रामीण आरोग्य जपणारे महत्वाचे माध्यम आहे. ही आरोग्य केंद्र सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी ही तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयाची आहे. मात्र गोरेगावचे तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालय प्रभावी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या हलगजी कारभारामुळे वाऱ्यावर आहे. त्यामुळे येथे कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्तीची मागणी होत आहे.

गोरेगाव तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयातंर्गत कुऱ्हाडी, कवलेवाडा, सोनी, चोपा, तिल्ली व मोहगाव या पाच प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. या आरोग्य केंद्रातंर्गत शेकडो गावातील नागरिकांना वेळेवर व नियमीत आरोग्य सेवा उपलब्ध होणे अपेक्षित आहे. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे सर्वदृष्टीने सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी ही तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयाची आहे. त्यासाठी जिल्हा आरोग्य विभाग तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयाला आवश्यक त्या सेवा पुरविते.

मात्र येथील प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगजी कारभारामुळे तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालय वाऱ्यावर आहे. परिणामी त्याचा फटका प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवेला व पर्यार्याने नागरिकांना बसत आहे.

विशेष म्हणजे, प्रभारीपदावर काम करण्याची इच्छा नसल्याने दिसत असल्याने त्याचे अधिनिस्त कर्मचाऱ्यांवरही वचक नाही. त्यामुळे कर्मचारीही वेळकाढू धोरण अवलंबत असल्याचे दिसून येते. त्यामुळे येथे कायम तालुका वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी तालुकावासीयांनी केली आहे.

# विधानसभा अध्यक्षांच्या बैठकीत इथेनॉल प्रकल्पाचा मार्ग मोकळा

**भंडारा** :– विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारला विश्राम भवन भंडारा येथे विविध विकास कामांचा आढावा घेतला. तसेच साकोली, लाखनी, लाखांदूर तालुक्यातील इथेनॉल प्रकल्पाकरिता सुमारे ५५ हेक्टर जमीन उपलब्धतेबाबत या बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.



या चर्चेत भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.च्या इथेनॉल प्रकल्पाचा मार्ग मोकळा करण्यात आल्याने रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. बैठकीला यावेळी आमदार राजु कारेमोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस., उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोदवड, उपविभागीय अधिकारी नितीन सदगीर, तहसिलदार अक्षय पोयाम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा कुरसंगे,एमआयडीसी नागपूर प्रादेशिक अधिकारी भानुदास यादव, उपअभियंता श्रीकांत ईरावार आदी अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सेवानिवृत्त शिक्षकांच्या समस्यांबाबत अध्यक्षांनी महत्त्वपूर्ण तोडगा काढला. सेवानिवृत्त शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबत ३० जूनपर्यंत मार्गदर्शन मागवून प्रकरण सादर करण्याच्या सूचना अध्यक्षांनी शिक्षण विभागाला दिल्या. जिल्हा उपनिबंधक भंडारा व मजूर सहकारी संस्थांचे प्रतिनिधी यांचे समवेत अध्यक्षांनी चर्चा केली. लाखनी तालुक्यातील रामपुरी येथील अपूर्ण तलावाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

# ग्रामीण विकासासाठी ५.२२ कोटी मंजूर

**गोंदिया** : गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी जिल्हा परिषदेला ग्रामीण भागातील विकासाकरीता ७.५० कोटी रुपयाच्या कामाचे सादर केलेल्या नियोजनातून ५ कोटी २२ लाख रुपयाच्या कामांना मंजुरी मिळाली आहे.



जिल्हा परिषद अध्यक्ष सीमा मडावी यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यातील ५ हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधा योजनेंतर्गत ७.५० कोटीमधून ५.२२ कोटी रुपयाची मंजुरी दिली. यात कुडगा ग्रामपंचायत ४० लाख, खमारी ५३ लाख, नागरा ६० लाख, काटी २८ लाख, कटंगीकला ४६ लाख, फुलचूरटोला ५१ लाख, फूलचूर ६७ लाख, कामठा ४४ लाख, कारंजा ४९ लाक,एकोडी ३५ लाख असे ५.२२ कोटीच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. निधी मंजुर करुन दिल्याबद्दल माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांचे जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा परिषद शिक्षण सभापतीसह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांनी त्यांचे आभार मानले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहात २० टक्के जागा उपलब्ध करा

**गडचिरोली/सावली** :–: मागासवर्गीय विभागाने वसतीगृहाची घोषणा केली मात्र, वसतीगृह तयार होण्यास बराच कालावधी लागणार असल्यामुळे इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतीगृहात २० टक्के जागा उपलब्ध करुन देण्यात याव्या अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघ शाखा सावली यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदनाव्दारे केली आहे.



नायब तहसीलदार सागर काबंळे यांचा मार्फत निवेदन देतांना राष्ट्रीय ओबीसी महासंघ सावली तालुक्याचे अध्यक्ष कविंद्र रोहणकर, अविनाश पाल, अर्जुन भोयर, दिवाकर गेडाम, भाऊराव कोठारे (सचिव), विशाल करंडे, तुळशिदास भुरसे आदी उपस्थित होते. गडचिरोली येथे राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचे जिल्हाध्यक्ष रुचित वांढरे व प्रफुल मेश्राम यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांना निवासी उपजिल्हाधिकारी अनंत वालस्कर यांच्या मार्फेत निवेदनाव्दारे केली आहे.


१६ मे १९८४ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शासकीय वसतिगृहात आर्थिकदुष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना २० टक्के जागा राखीव ठेवण्यात येत होत्या. व या २० टक्के जागांमधून बहुतांशी इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रवेश होत होता. दिनांक ३० जुलै २०१४ च्या परिपत्रकानुसार अनुसूचित जाती ८० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती १० टक्के आणि इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग १० टक्के वसतिगृहात आरक्षण होते. तथापि इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्रालय स्वतंत्र स्थापन झाल्यानंतर, २१ डिसेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार समाजकल्याण विभागाच्या सर्व वसतीगृहामध्ये ८० टक्के अनुसूचित जाती चे विद्यार्थी, ३ टक्के अनुसूचित जमातीचे विद्यार्थी, ५ टक्के विमुक्त जाती व भटक्या जमातीचे विद्यार्थी, ५ टक्के आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व इतर मागास प्रवर्ग विद्यार्थी, २ टक्के विशेष मागास प्रवर्गाचे विद्यार्थी, ३ टक्के अपंग विद्यार्थी, २ टक्के अनाथ विद्यार्थी, याप्रमाणे वर्गीकरण करण्यात आल्याने इतर मागासवर्गीय विद्यार्थी या वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित आहेत.

शासनाने दिनांक ३० जानेवारी,२०१९ परिपत्रक काढून इतर मागासवर्गीय कल्याण मंत्रालय स्वतंत्र करून स्वतंत्र वसतीगृहाची घोषणा केली असली तरी, सध्य: स्थितीत नवीन नियुक्त कर्मचारी वर्ग व इमारती उभारणे अथवा भाड्याने घेणे यासाठी बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे, त्यामुळे मागील तीन वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर इतर मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत.

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नवीन वसतीगृहाची सुविधा होईपर्यंत समाजकल्याण विभागांतर्गत अस्तित्वात असलेल्या वसतीगृहाची व इमारतींची क्षमता वाढवून वाढीव क्षमतेत २० टक्के इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राहणे, जेवण व इतर वसतिगृहाची सुविधा पुरविण्याकरिता इतर मागासवर्गीय कल्याण विभागाने निधी पुरविल्यास इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांची सोय होऊन वसतीगृहाची प्रवेशाची समस्या दूर होईल. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतीगृहात २० टक्के जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघ शाखा सावली यांची मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.



# महाराष्ट्र व मध्यप्रदेशात ५० "सारस" पक्ष्यांचे वास्तव्य



**गोंदिया** :– गेल्या आठवड्यात पार पडलेल्या सारस गणनेव्दारे महाराष्ट्रात अंदाजे ५० तर मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातही ५० सारस पक्ष्यांचे वास्तव्य असल्याचे समोर आले आहे. गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात ही गणना १३ ते १८ जून दरम्यान पार पडली. यापैकी चंद्रपूर जिल्ह्यातून सारस पक्षी जवळपास नामशेष होण्याच्या मार्गावर पोहोचला असून १ नर सारस जिल्हात आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सारस पक्ष्यांच्या संख्येत नाममात्र वाढ झाल्याने त्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल उचलणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात २०ते २३ गटाने ७- ते ८० ठिकाणी स्वंयसेवकांच्या मदतीने ही गणना पार पडली.गणनेअंती महाराष्ट्रात ४७ ते ५० सारस पक्ष्यांचे वास्तव्य असून मध्यपद्रेशातील बालाघाट जिल्ह्यात ५६ ते ५८ सारस पक्ष्यांचे वास्तव्य असल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्रातील केवळ गोंदिया या जिल्ह्यात मोठ्या संख्येने सारस या पक्ष्याचे अस्तित्व टिकून राहिले आहे. सारस क्रौंच हा मुख्यत्वे भातशेतीत किंवा छोट्या तलावात (याला बोडी म्हणतात) घरटे तयार करतो. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये या पक्ष्यांच्या अस्तित्वाला अधिवास नष्ट होणे, कीटकनाशकांचा वापर आणि मानवी हस्तक्षेपाचा धोका निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात वाघ-बिबट्यांप्रमाणे सारस पक्ष्यांचीही दरवर्षी गणना होते. "सेवा" (Sustaining Environment and Wildlife Assemblage) ही संस्था २००४ पासून दरवर्षी या पक्ष्यांची गणना करीत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी दिली.

२००४ साली राज्यात केवळ चार ते सहा सारस पक्ष्यांचे वास्तव्य होते. यंदा गोंदियात ४५ ते ४७, भंडाऱ्यात २ आणि चंद्रपूर जिल्ह्यात केवल १ सारस पक्षी, असे एकूण अंदाजे ५० पक्ष्यांची नोंद करण्यात आली होती.. यामधील चंद्रपूर जिल्ह्यात केवळ १ नर सारस पक्षी आढळला असून त्याला प्रजननासाठी मादी न मिळाल्यास या प्रदेशातून सारस पक्षी नामशेष होईल, अशी भीती बाहेकर यांनी वर्तवली आहे.

गेल्यावर्षीच्या नोंदीत राज्यात ४१ ते ४२ सारस पक्ष्यांचे वास्तव्य होते. यंदाच्या गणनेमधूनही गोंदिया जिल्ह्यामध्येच मोठ्या संख्येने या पक्ष्यांचा अधिवास असल्याचे समोर आले आहे. अभियानात गोंदियाचे



उपवनसंरक्षक एस. युवराज, दक्षिण वनमंडळ बालाघाटचे अनुराग कुमार, वनपरिक्षेत्र अधिकारी हट्टा धर्मेंद्र शर्मा, वनपरिक्षेत्र अधिकारी गोंदिया सुशिल नादवटे, वनपरिक्षेत्र अधिकारी आमगांव पी.बी.चन्ने, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा शेषराव आकरे, गोंदिया ज़िल्हा पोलीस अधिक्षक मंगेश शिंदे व समस्त वनकर्मचार्यांचे सहकार्य लाभले.

या गणनेत सेवा संस्थेचे भरत जसानी, चेतन जसानी, अंकित ठाकुर, शशांक लाडेकर, कन्हैया उदापुरे, दुस्यंत आकरे, संजय आकरे, अशोक पडोळे, दुश्यंत रेभे, अश्विनीकुमार पटले, पिंटु वंजारी, रूचीर देशमुख, मुकुंद धुर्वे, बबलु चुटे, बंटी शर्मा, रिशील डाहाके, सौरभ घरडे, सलिम शेख, दिपक मुंदडा, राकेश डोये, दानवीर मस्करे, कमलेश कांमडे, जैपाल ठाकुर, जलाराम बुधेवार, प्रशांत मेंडे, प्रविण मेंढे, विकास फरकुंडे, डॉ. तांडेकर, मनिष कुर्वे, डिलेश कुसराम, लोकेश भोयर, संदिप तुरकर, पप्पु बिसेन, शेरबहादुर कटरे, बसंत बोपचे, धर्मेंद्र बिसेन, राहुल भावे, रतिराम क्षीरसागर, ललित भांडारकर, रवि पालेवार, अभय कोचर निशांत देशमुख, सिंकदर मिश्रा,गौरव मटाले,नखाते, कार्तिक चौहान, शेखर फुडे, विशाल कटरे, जितु हरिनखेडे, मुकेश बिसेन, तपेश कटरे, चंदन राहंगडाले, राकेश टेंभुणीकर, पराग जीवानी,अमित बेलेकर, . अतुल ढबाले, TRACT संस्था व भंडारा जिल्ह्यातील SEAT संस्थेचे शाहिद खान, राजकमल जोब असे २०५ सदस्य सहभागी झाले होते.